गुरूवार, २ मे २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २४५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 2 MAY 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-245 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05



# मोदी पुन्हा सत्तेवर आल्यास संविधान -आरक्षणही संपवणार

## नाना पटोले : केंद्रात इंडिया आघाडीची सत्ता आणा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर : काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले व स्वातंत्र्यानंतर ६०-६५ वर्षात देशात विविध क्षेत्रात विकासाची कामे केली. विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य, शिक्षण, जलसंपदा सह सर्वच क्षेत्रात प्रगती केली. काँग्रेसने ६० वर्षात जे उभे केले ते सर्व पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकून टाकले. देश विकून देश चालवला आणि २०५ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा डोंगर उभा करुन ठेवला. भाजपाने जाती धर्माच्या नावावर भांडणे लावून सामाजिक शांतता बिघडवण्याचे पाप केले. लोकसभेची ही निवडणुक देशाच्या स्वातंत्र्याची दुसरी लढाई असून लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी इंडिया आघाडीची केंद्रात सत्ता आणा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले.**

लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ अहमदपूर तालुक्यातील रोकडा सावरगाव येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा झाली. या सभेला माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार वजाहत मिर्झा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री विनायकराव पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे निरीक्षक माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, अहमदपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. गणेश कदम, एन आर पाटील, चंद्रकांत मद्दे, रामभाऊ बेल्लाळे, सिराज जहागीरदार, विलास पाटील, निळकंठ मिरकले, ज्योतीताई पवार, निलेश देशमुख, भाग्यश्री क्षिरसागर, सांब महाजन, कलीम अहमद, अनिल शेळके, शंकर गुट्टे, सोमेश्वर कदम, आर. डी शेळके, संजय पवार, विकास महाजन, श्रीकांत बनसोडे, हेमंत माकणे यांच्यासह काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपा सरकारवर टीका करत नाना पटोले म्हणाले की, भाजपने मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन दिले पण त्यांनी आरक्षण दिले नाहीच उलट राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी वाद लावला. भारतीय जनता पक्ष व आरएसएस हे आरक्षण विरोधी आहेत. नरेंद्र मोदी यांची पुन्हा सत्ता आली तर ते संविधान बदलणार व संविधानाने दिलेले आरक्षणही संपवणार. भाजपने २०१४ साली खोटी आश्वासने देऊन सत्ता मिळवली, २०१९ मध्ये पुलवामा येथे हल्ल्यात ४० जवान शहिद झाले, हा हल्ला कोणी त्याचा तपास आजही लागलेला नाही. मोदी सरकारने जीएसटीच्या माध्यमातून जनतेकडून वसुली केली व अदानी, अंबानीचे घर भरले. कांदा निर्यात बंदी उठवताना गुजरातची उठवली पण महाराष्ट्रातील कांदा निर्यातला परवानगी दिली नाही. भाजपा सरकारने महाराष्ट्राचे उद्योग गुजरातला पळवले. राम मंदिर उद्घाटन व संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आदिवासी असल्याने भाजप सरकार व नरेंद्र मोदी यांनी आमंत्रण न देऊन त्यांचा अपमान केला, असेही नाना पटोले म्हणाले. काँग्रेसने जनतेला गॅरंटीकार्ड दिले आहे, गरिब महिलांना वर्षाला एक लाख रुपये देणार, ३० लाख सरकारी रिक्त पदे भरणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी करणार, एमएसपीचा कायदा आणणार, शेती जीएसटी मुक्त करणार, जातनिहाय जनगणना करणार आहे असे नाना पटोले यांनी सांगितले. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूरात झालेल्या पंतप्रधान मोदींच्या सभेत सामान्य माणसाच्या प्रश्नाबद्दल भाष्य करण्यात आले नाही. २०१४ च्या निवडणुकीत मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीतून मेट्रोचे कोच तयार करू असे भाजपवाले म्हणाले होते, 2019 ला त्याच फॅक्टरीतून बुलेट ट्रेन कोच तयार करू असे म्हणाले आणि आता 2024 ला ते त्या फॅक्टरीतून वंदे भारत कोच तयार करू असे म्हणतात पण महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे हे खासदार म्हणून या फॅक्टरीतून कोच बाहेर काढतील. नांदेड अहमदपूर रेल्वे विकसित झाली पाहिजे, रोकडा सावरगाव पर्यंत प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत रस्ता करू, या परिसरातील ऊस मांजरा परिवार घेऊन जाईल.

# कृषी जगत परिवाराचे रामेश्वर सुसे यांना दै. आधुनिक केसरीचा कृषी सेवेतील 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** राहुरी विद्यापीठातून कृषी पदविका घेतल्यानंतर कृषी रसायन कंपनीचा १५ वर्षे अभ्यास करून शेतकऱ्यांना फळबागांविषयी सातत्याने मार्गदर्शन करणारे पैठण येथील कृषी जगत परिवाराचे संचालक फळबाग तज्ज्ञ रामेश्वर सुसे यांनी पैठण तालुक्यातील कृषी क्षेत्रासह समाजसेवा करत आपली ओळख निर्माण केली आहे. शेतकरी मित्र म्हणून कृषी जगत परिवाराचे व रामेश्वर सुसे यांचे कृषी सेवेसह समाजकार्य निश्चितच कौतुकास्पद आणि गौरवास्पद आहे. त्यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर होत असल्याने दै. आधुनिक केसरीच्या या वर्षीच्या कृषिसेवेतील राज्यस्तरीय 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कारासाठी नामांकन झाले आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे होत असलेल्या कार्यक्रमात रामेश्वर सुसे यांना 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.






दै.आधुनिक केसरीच्या वतीने 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्काराची घोषणा करण्यात आली व राज्यभरातून नागरिक व विविध संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते.

वरीलप्रमाणे सविस्तर कामाचा कृषी जगत परिवार यांचा प्रस्ताव आला असता या प्रस्तावाचा आधुनिक केसरीच्या निवड समितीने संचालक रामेश्वर सुसे, कृषी जगत परिवार, पैठणला भेट दिली आणि पाहणी केली. रामेश्वर सुसे यांच्याकडून समाजसेवा, शेतकरी, फळबाग मार्गदर्शन, तसेच षष्ठी सोहळ्यातील अन्नदान याविषयी संपूर्ण माहिती घेतली.

शेतकऱ्यांना नेहमीच बांधावर जाऊन फळबागांचे योग्य मार्गदर्शन करत असलेल्या कृषी जगत परिवाराचे व रामेश्वर सुसे यांचे कार्य इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. दै. आधुनिक केसरीने त्यांच्या कृषिसेवेतील व समाजसेवेतील कार्याची दखल घेत 'आयडॉल महाराष्ट्र' पुरस्कार जाहीर केला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे पुरस्कार देऊन रामेश्वर सुसे यांचा गौरव करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल कृषी जगत परिवारचे संचालक रामेश्वर सुसे यांचे समाजातील विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी संकटात : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज



**निपाणी :** देशात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पद्धतीने देश चालवत आहेत. हे पाहिल्यानंतर चिंता वाटते. नरेंद्र मोदी हे हुकूमशाहीच्या रस्त्याने निघाले आहेत. लोकशाही उध्वस्त करणार आहेत. ही निवडणूक देशाच्या संविधान आणि लोकशाहीसाठी महत्त्वाची आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवार म्हणाले की, देशाच्या लोकसभेची निवडणूक आली आणि भारताचा कारभार हा कोणाच्या हातामध्ये द्यायचा याचा निकाल आपल्या सगळ्यांना घ्यायचा आहे. या निवडणूकीकडे जगाचं लक्ष आहे. आज ही स्थिती का झाली? भारत हा देश लोकशाहीचा देश आहे. स्वातंत्र्याआधी, स्वातंत्र्य मिळण्यासाठी या देशामध्ये अनेकांनी आयुष्याचा महत्त्वाचा काळ घालवला, आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा देश लोकशाहीच्या पद्धतीने चालवायचा हा निकाल काँग्रेसच्या नेतृत्वाने केला. आपल्या आजूबाजूचे देश बघितले, पाकिस्तानमध्ये कधी लोकशाही असते, तर कधी लष्कराची हुकूमशाही असते. श्रीलंकेमध्ये मध्यंतरी हुकूमशाही होती. बांग्लादेशमध्ये लोकशाही आहे, एक काळ असा होता की तिथं लष्कराचं राज्य होतं. पण भारत हा देश असा आहे की इथे फक्त लोकांचं राज्य होतं, लोकशाही होती आणि त्याचं महत्त्वाचं कारण जवाहरलाल नेहरू असो, नंतरच्या काळामध्ये लाल बहादूर शास्त्री असो, इंदिरा गांधी असो, राजीव गांधी असो या सर्वांनी सामान्य माणसाचा अधिकार आणि हा देश चालवायला लोकशाहीची पद्धती याबद्दल कधी तडजोड केली नाही. त्यामुळे हा देश लोकशाहीच्या मार्गावर गेला. लोकशाहीची परीक्षा या निवडणुकीमध्ये आहे, असे शरद पवार म्हणाले. शरद पवार म्हणाले की, आज लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने इतक्या संख्येने तुम्ही उपस्थित असलेल्या तुमचं स्वागत करायला मला मनापासून आनंद होत आहे. देशाचं सूत्र देशाचा कारभार कुणाच्या हातात द्यायचा आणि गेली ५ -१० वर्षं ज्यांच्या हातात तुम्ही सत्ता दिली, त्यांच्या कामाचा आढावा घ्यायच्या दृष्टीने ही निवडणूकआधीची सभा अत्यंत महत्त्वाची आहे.


# जेऊर पाटोदा ग्रामपंचायतीच्या बिहार पॅटर्नमुळे फुलली हिरवीगार वनराई


आधुनिक केसरी न्यूज

**किशोर पाटणी**


**शिर्डी :** कोपरगाव शहरालगत असलेल्या जेऊर पाटोदा ग्रामपंचायत हद्दीत सम्यक नगर येथे वृक्षारोपणाचा बिहार पॅटर्न राबविण्यात आला असून भर उन्हाळयात २२० चिंच, चिकू, आंबा, नारळ आदींसह विविध जातींचे झाडांचे संवर्धन करण्यात आले असल्याची माहिती संरपच मनिषा सतिश केकाण यांनी दिली.

धुळे जिल्ह्यातील बिहारी नावाच्या गरीब शेतकऱ्याने वृक्ष लागवडीसह संगोपन संरक्षनाचा प्रकल्प यशस्वी ठरला त्यामुळे झाडे वृक्षारोपणाचा बिहार पॅटर्न या नावाने सण २००८ पासून राबवण्यास राज्य सरकारने स्वीकारला कोपरगाव पंचायत समितीचे बि.डी.ओ सचिन सूर्यवंशी यांनी हा प्रकल्प प्रभावी पणे राबवला. माजी सभापती मच्छिंद्र केकाण यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येतात ग्रामपंचायत हि राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित असून गावातील घरे सर्वाधिक घरे ही महिलांच्या नावावर आहेत जेऊर पाटोदा ग्रामपंचायतने हा प्रकल्प प्रभावीपने राबवला असून सम्यकनगर येथे असलेल्या ओपन स्पेस चा वापर करण्यात आला या ठिकाणी विविध २२० झाडे लावली तात्कालिन ग्रामसेवक एस. व्ही. कोतकर ग्रामसेवक संदिप थोरात सरपंच मनीषा सतिष केकान यांनी पुढाकार घेतला परिसरातील लोकांनी आवडीनुसार झाडे भेट दिली आज या ठिकाणी आवळा, पेरू चिकू चिंच बोर आंबा सतपरणी नारळ बेल बांबू वड लिंब आदी अनेक प्रकारची झाडे लावली आहेत. रोजगार सेवक अंभोरे व निकम बाई हे देखरेख नेमण्यात आले आहेत तर ग्रामस्थ चांगदेव सरोदे यांनी मनाचा मोठेपणा दाखवून स्वतःच्या बोअरवेलचे पाणी झाडांसाठी मोफत उपलब्ध करून दिले आहे. या उपनगर व गावातील गावकरी यांनी आपल्या घरासमोर देखील विविध झाडांची लागवड करुन पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले आहे. या परीसराला भेट दिल्यानंतर वृक्षारोपणाला किती महत्त्व आहे याचा प्रत्यय येतो या कामात ग्रामपंचायत सदस्य सर्व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले, असे प्रकल्प ठिकठिकाणी राबविण्यात येणे काळाची गरज असल्याचे मत सतिश केकाण यांनी मत व्यक्त केले हा उपक्रम बघण्यासाठी अनेक लोक भेट देत आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932





आधुनिक केसरी

वडील त्याला विचारतात, ' पाहिलेस ना, गरीब लोक कसे जगतात ? आपण त्यांच्यापेक्षा किती श्रीमंत आणि श्रेष्ठ आहोत ! तू भाग्यवान आहेस की अशा या घरात तुझा जन्म झाला. ' यावर तो मुलगा उत्तरतो, ' बाबा, ते कसले गरीब ? मला तर वाटते की खरे गरीब तर आपण आहोत. आपला एवढा मोठा बंगला ! पण त्या बंगल्यातच आपण बंदिस्त राहतो. त्या खेडेगावी घर छोटे पण त्यासमोर असणारे हिरवेगार शिवार, डोलणारी पिके, दाट सावली देणारे वृक्ष. आपल्या बंगल्यासमोर बाग असली तरी त्या बागेला त्या शेताची सर नाही. आपल्याकडील पंचपक्वान्ने त्यांच्याकडील ताज्या चवदार जेवणापुढे फिकी आहेत. रात्री सगळे आकाश तिथे डोळ्यांपुढे खुले होते. त्या शेतावर काम करणाऱ्या काकांची मुले शेतातच राहतात. तिथे त्यांना काम शिकायला मिळते. आपल्या भावंडांसोबत खेळायला, राहायला मिळते. जवळच्याच शाळेत ते पायी जातात. मला तर तीच माणसे आपल्यापेक्षा श्रीमंत आणि भाग्यवान वाटतात. ' ही छोटीशी गोष्ट खूप काही सांगून जाणारी आहे. आपण आपल्या मुलांना खरंच अशा वास्तवाशी परिचित करून देतो का ? आपण त्यांना सगळ्या सुखसुविधा पुरवून भविष्यातील आयुष्याच्या होणाऱ्या संघर्षासाठी कमजोर तर बनवत नाही ? आपल्या मुलांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणून आपण चांगल्या शाळेत पाठवतो. पण त्यापेक्षाही बाहेरचं जग, निसर्ग म्हणजे अनौपचारिक शिक्षण देणारी मोठी शाळा आहे.

## हितगुज



पुष्प ५३वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

## दुःख, यातना, प्रतिकूलता

बऱ्याच वेळा ही प्रक्रिया द्वंद्वात्मक असते. द्वंद्वात्मकताच एक प्रकारे उत्क्रांतीची जनक असते. मानवाच्या अस्तित्वास, मानवपणास घातक अशा वातावरणात मानवपणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी काही व्यक्ती 'नारायणत्व' प्रबळ करीत, महानतेच्या बीजाचे अंकुरण, पल्लवन करीत जन्माला येतात. त्यांच्यातील 'नारायण' शक्तीला तीक्ष्ण करण्यासाठी विधाता दुःखाचे, प्रतिकूलतेचे, यातनांचे ढीग रचतो. प्रत्येक क्षणी आंतरिक सामर्थ्य परजून धीरगंभीरतेने महान व्यक्ती या दुःखाला पराजित करून त्यातून जीवनप्रेरणा प्रसारित करते. तात्पर्य, आजवर सर्व संतांनी दुःख, वेदनांना सहज स्वीकृती देऊन त्याचे स्वागत केले, त्याचे कारण हे सत्य आहे. रामत्व आपणास अगाध थोरवी, उदात्ततेचा बोध करून देते. प्रत्येक प्रसंगी यातनाचक्रांतून जात असताना रामाने धैर्य, विवेक, गांभीर्य ढळू दिले नाही. प्रत्येक प्रसंगी त्याने आपले आत्मिक, नैतिक सौंदर्य, उच्चता प्रमाणित केली. प्रत्येक सुख-दुःखात समरस राहून त्याने कर्तव्यात कसूर केली नाही, तसेच आदर्शाला उणेपणा येऊ दिला नाही. तेच श्रीकृष्णाच्या बाबतीत सांगता येईल. श्रीकृष्णाचा जन्मच कारावासात झाला. नवजात बालक मुसळधार पावसात दुथडी भरून वाहणाऱ्या यमुनेच्या पुरातून रात्री गोकुळात जाते. अशी नियती आजवर कोणत्याही सामान्य बालकाला मिळालेली नाही. परमेश्वर स्वतः मानव बनताना आपली कुंडली अशी संकटग्रस्त, दुर्धर व पिडामय बनवतो, याचे इंगित काय असावे? याचा विचार करण्याची वेळ आज आहे. अनेक प्रकारच्या दुष्प्रवृत्तींच्या अन्यायाने भरडून निघणाऱ्या, निराशेने ग्रासणाऱ्या, हताशेने अगतिक होणाऱ्या सज्जन, पापभिरू, विचारी माणसाची मती कुंठीत करणारे, त्याला व्यसनाधीन करणारे, त्याला आत्महत्येस प्रवृत्त करणारे, त्याला चुकीच्या मार्गाने वाताहतीकडे नेणारे आजचे वातावरण आहे. आजवरच्या सर्व रूढ मान्यतांना प्रश्नचिन्हे दिली जाताहेत.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## श्री साईबाबा

आधुनिक केसरी

श्री साईबाबांच्या हयातीत त्यांच्या जन्मस्थानाचा, मातापित्यांचा तसेच धर्म आणि पंथांचा शोध कोणास लागला नाही. स्वतः श्री



साईबाबांनीही याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. श्री साईबाबांच्या हयातीत प्रसिद्ध झालेल्या संतकवि दासगणू महाराजकृत ग्रंथ भक्तिलीलामृत वर्ष १९०६ शके १८२८ तसेच संतकथामृत वर्ष १९०८ शके १८३० या दोन्ही ग्रंथात तसेच समकालीन महत्वपूर्ण दस्तऐवजांमध्येही बाबांच्या जन्मस्थानाबाबत कोणताच उल्लेख आढळून येत नाही. सर्व साईभक्त ज्या ग्रंथास प्रमाण मानतात त्या श्री साईसच्चरित ग्रंथातसुद्धा श्री साईबाबांच्या जन्मस्थळाबाबत कोणताच उल्लेख सापडत नाही.
श्री साईबाबांच्या जन्मस्थानाबाबत सर्वप्रथम उल्लेख हा १९२५मधे प्रसिद्ध झालेल्या श्री साईलीला वर्ष ३रे चैत्र शके १८४७ अंक १ला मधील स्फुटविषय[३] या सदरात आढळून येतो पण, या विषयीचा उल्लेख भक्त म्हाळसापती यांनी स्वतः सांगितलेल्या बाबांबद्दलच्या अनुभवात आढळून येत नाही हे विशेष. त्याच वर्षी प्रकाशित झालेल्या दासगणू महाराजकृत भक्तिसारामृत ग्रंथात श्री साईबाबांच्या गुरूंचा आणि त्यांची जन्मकथा या दोन्ही गोष्टींचा उल्लेख अध्याय २६ मध्ये आढळतो. पण बी व्ही नरसिंह स्वामी यांना त्यांनी दिलेल्या मुलाखतीनुसार फक्त भक्तलीलामृत या ग्रंथातील केवळ ३ अध्याय बाबांसमोर वाचून दाखवण्यात आले होते. म्हणून भक्तलीलामृत वगळता संतकथामृत, भक्तिसारामृत हे ग्रंथ बाबांच्या समोर वाचून दाखवण्यात आलेले नाहीत. ज्या ग्रंथात बाबांच्या गुरूंची व बाबांची जन्मकथा आढळते तो भक्तिसारामृत ग्रंथ देखील श्री साईंच्या महानिर्वाणानंतर लिहला गेला आहे. श्री साईसच्चरित ग्रंथ देखील अध्याय ५३ ओवी १७९ अनुसार सन १९२२, शके १८४४ मधील चैत्रमासी लिहण्यास प्रारंभ होऊन सन १९२९ शके १८५१मधील जेष्ठमासात पूर्ण झाला.[४] दासगणू महाराज ज्या गोपाळराव महाराजांना बाबांचे गुरू असू शकतील असे संबोधतात, ते बाबांचे गुरू असूच शकत नाहीत असे प्रतिपादन कथित साईजन्मस्थानाचा शोध लावणारे वि.बी.खेर आपल्या साईबाबा ऑफ शिरडी या पुस्तकात करतात. तसेच दासगणू महाराज यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत बाबांचे गुरू एखादे सुफी फकीर असावेत असे मत द इटर्नल साक्षी या प्रकरणात ते व्यक्त करतात.[५] श्रीपादवल्लभचरित्रामृत ग्रंथातही बाबांचा जन्म पाथरीत झाला असे लिहले गेले असले तरी पाथरी हे बाबांचे जन्मस्थान म्हणून सर्वप्रथम प्रकाशझोतातच १९२५ साली साईलीला या मासिकातून जगापुढे आले. भक्तिसारामृतकार दासगणू महाराज आणि महाराजांचे अनुभव तसेच साईसच्चरिताचा उपोद्धात लिहणारे काकासाहेब दीक्षित यांच्या कल्पनेतून श्री साईबाबा हे पाथरीच्या ब्राम्हण कुटुंबात जन्मले आहेत असा समज पसरवून देणारे लिखाण सुरू झाले.



आधुनिक केसरी

## नित्य स्मरावी पंढरी ||


**ऐसा भाव जपा मनी | मुखी वसे संतवाणी ||१||**
**शुद्ध कर्म ऐसे करी | जेणे सुखावेल हरी ||२||**
**रात्रंदिन लागे ध्यास | व्हावे ज्ञानियांचा दास ||३||**
**लागता विठुचा लळा | फुले सावताचा मळा ||४||**
**ज्ञाना तुका संत सारे | जीवीचे सगे सोयरे ||५||**
**घडावी मानस वारी | नित्य स्मरावी पंढरी ||६||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**भोक्ता को वाणी नहीं, वाणी जाना नाहिं ।**
**मनन विवेचन थकित है, सो सुख वरणि न जाहिं ।।०७।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल पंचम अध्याय) ०४/०५/०७**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**आत्म्याला वाणी नाही की तो बाहेर आपला आनंद प्रगट करू शकेल आणि जी वाणी बाह्य जगतात कार्य करीत आहे, ती "त्या" आनंदाला जाणत नाही. बुद्धीमान त्याचे मनन, विवेचन करण्यास असमर्थ आहेत, त्या महासुखाचे वर्णन भौतिक साधनांनी ( मन, बुद्धी, इंद्रिये) होऊ शकत नाही.**



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.............................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरूपण

आधुनिक केसरी

चौ-यांशी लक्ष योनीतील जीव प्राणी या अफाट पसरलेल्या विश्वाचा भाग आहेत. सगळ्यांच प्राण्यांच्या, पक्षाच्या वृक्षांच्या देहाचे मूळ जर कोणी असेल तर ते म्हणजे "पाणी" होय. आपले शरीर पाण्यापासून बनते, तसेच झाडाच्या मुळ्यांनी शोषलेले पाणी जेव्हा झाडाच्या शेंड्यापर्यन्त पोहचते तेव्हा सगळे झाड फळा फुलांनी लगडून जाते. आणि ते दृष्य पाहिल्यावर आपण निसर्ग आपल्याला किती भरभरून देतो याची कल्पना येते. एकातून दुसरे असे निर्माण होते हे या उदाहरणावरून लक्षात आले असेल. एकाचं पाण्यापासून पाने, फळे, फुले असे निरनिराळे बदल घडून येतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नामाचा अनुभव

आधुनिक केसरी

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल. भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दुःखाची जाणीव कमी होते. दुःखाची



जाणीव नसल्यावर दुःख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे. उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

**२१. नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.**

## निरूपण

आधुनिक केसरी

**अबद्धमंत्रे प्राणी चळलें । या नांव आदिभूतिक ॥ ५५ ॥**
**ब्राह्मणसमंध शरीरीं । बहुसाल पीडा करी ।**
**शनेश्वराचा धोका धरी । या नांव आदिभूतिक ॥ ५६ ॥**
**नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचंद्र ।**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, २ मे २०२४
adhunikkesari.com

# मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी केंद्रावर सुविधा उपलब्ध कराव्यात : सतीश पंच

## जिल्हाधिकारी आणि मुख्य जिल्हा निवडणूक निरीक्षक अधिकाऱ्यांना व्यापारी महासंघाचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : सध्या देशात लोकसभा निवडणूक कार्यक्रम चालु असून काही राज्यात मतदान पार पडले आहे तर काही राज्यात होणार आहे. महाराष्ट्र राज्यातही दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले असून, देशात सर्वात कमी 53.51 टक्के मतदान महाराष्ट्रात झालेले आहे. कडाक्याचे ऊन हे त्यामागचे प्रमुख कारण असून तिसऱ्या टप्प्यात जालना लोकसभेसाठी 13 मे ला मतदान होत आहे. या काळात अधिक तापमान राहणार असल्याने अशा परिस्थितीत ज्येष्ठ आणि महिलांसाठी वेगळी रांग, प्रत्येक मतदान केंद्रावर लागणाऱ्या मतदान रांगेसाठी मंडप, पिण्याचे पाणी आधी सुविधा उपलब्ध करून दिल्यास प्रत्येकाला मतदान करून लवकर घरी परतता येईल. या सुविधांमुळे मतदारही भर उन्हात बाहेर पडतील आणि त्यामुळे मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढणार असल्याने या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच आणि जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या ग्रामीण विभागाचे जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांनी केली आहे.**

यासंदर्भात उभयतांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण नाथ पांचाळ यांना आज बुधवार दि. 1 मे रोजी निवेदन दिले. यावेळी जालना लोकसभेचे निवडणूक निरीक्षक राजेश कुमार हे देखील उपस्थित होते. यावेळी त्यांना निवेदन देण्यात येऊन सखोल चर्चा करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात मतदान कमी होण्याचे बरीच कारणे आहेत. मात्र, त्यात प्रामुख्याने वाढलेले ऊन हे एक मोठे कारण आहे. सध्या राज्यात उन्हाळ्यामुळे तापमान वाढलेले आहे. त्यामुळे असह्य उकाडा जाणवत आहे. सकाळपासूनच ऊन प्रखरतेने पडत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मे महिन्यात उष्णतेची तीव्र लाट येण्याची दाट शक्यता आहे. या महिन्यात तापमा 40 ते 45 अंश असते. त्यामुळे एवढ्या रखरखत्या उन्हात जेष्ठ नागरीक, नागरीक, महिला मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे टाळतात. त्यामुळे मतदानाची टक्केवारी कमी होऊ शकते. दि. 13 रोजी रोजी जालना लोकसभा मतदार संघासाठी मतदान होणार आहे. ऊन्हामुळे मतदान कमी होवु नये, याकरीता आपण स्वतः जालना जिल्हयातील लोकसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्राचा सर्व्हे करून सर्व मतदान केंद्रात उन्हापासुन संरक्षणकरीता मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सर्व मतदान केंद्रावर जेष्ठ नागरिकांसाठी सोय-सुविधा, महिलासाठी स्वंतत्र रांग व्यवस्था आधी सुविधा उपलब्ध करून दिल्यास मतदानाचा टक्का वाढल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास यावेळी सतीश पंच यांनी व्यक्त केला. जालना जिल्हयातील सर्व मतदान केंद्रावर सेवा/सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती व्यापारी महासंघ जिल्हा जालनातर्फे सतीश पंच आणि हस्तीमल बंब यांनी केली आहे.



**सुविधा उपलब्धतेसाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करू– बंब**

मतदान म्हणजे लोकशाहीचा एक प्रकारे मोठा उत्सव आहे . त्यामुळे प्रत्येकाने मतदान हे कर्तव्य समजून या उत्सवात सहभागी होणे गरजेचे आहे . तथापि, देशभरात आतापर्यंत पार पडलेल्या निवडणुकीच्या दोन टप्प्यात मतदानाची टक्केवारी कमी दिसून येते आहे . दुसऱ्या टप्प्यात देशाच्या तुलनेत महाराष्ट्राची टक्केवारी तर सर्वात कमी आलेली असून, जालन्याची निवडणूक तिसऱ्या टप्प्यात 13 मे रोजी पार पडत आहे . या काळात तापमान भयावह असे राहणार असल्याने सुविधा उपलब्ध करून दिला तरच नागरिक मतदानासाठी बाहेर पडतील . मतदानाचा टक्का वाढावा याकरिता सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी व्यापारी महासंघ जिल्हा प्रशासनाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील आणि आवश्यकते सहकार्य करील, अशी ग्वाही हस्तीमल बंब आणि सतीश पंच यांनी जिल्हाधिकारी डॉ . श्रीकृष्णनाथ पांचाळ आणि जालना लोकसभेचे निवडणूक निरीक्षक राजेश कुमार यांना दिली .

**जालना व्यापारी महासंघाच्या सूचना स्वागतार्ह– राजेश कुमार**

सतीश पंच आणि हस्तीमल बंब यांनी सुमारे 20 मिनिटे जिल्हाधिकारी डॉ . पांचाळ आणि जालना लोकसभेचे निवडणूक निरीक्षक राजेश कुमार यांच्याशी चर्चा केली . व्यापारी महासंघाने मतदानाचा टक्का वाढण्यासाठी निवेदनात आणि प्रत्यक्ष चर्चेत केलेल्या मतदान केंद्रावर करावयाच्या मूलभूत सुविधांबाबतच्या सूचना स्वागतार्ह असल्याचे सांगत त्याबाबत निश्चितच अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही राजेश कुमार यांनी दिली . त्यांच्या तात्परतेबद्दल सतीश पंच आणि हस्तिमल बंब यांनी आभार व्यक्त केले .



# रामनगर, संघर्षनगर, प्रकाशनगर, विठ्ठलनगरात डॉ. कल्याण काळे यांचा झंझावाती प्रचार

## महागाईला आळा घालण्यासाठी काँग्रेसला मतदान करा : पांडभरे

आधुनिक केसरी न्यूज

**अतुल खंडगावकर**

**छत्रपती संभाजीनगर :** काँग्रेस पक्षाचे न्याय पत्र घेऊन काँग्रेस पक्षाचे लोकसभेचे उमेदवार डॉ. कल्याण काळे साहेब यांच्या प्रचारार्थ रामनगर, संघर्षनगर, प्रकाशनगर, विठ्ठनगर, म्हाडा कॉलनी, चिकलठाणा आदी परिसरात घरोघर जाऊन डॉ. कल्याण काळे यांच्या पंजाच्या निशाणीवर ठसा उमटवून मोठ्या बहुमताने विजयी करा, असे आवाहन करताना काँग्रेस पक्षाचे शहर सरचिटणीस सुभाष पाटील पांडभरे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ नेते अंकुशराव चौधरी पाटील, वल्लभसेठ भंडारी, पत्रकार अतुल खंडगावकर, बेंद्रे आप्पा, सांडू पाटील मुरदारे, ज्ञानेश्वर जाधव, नाना जगताप, पंडित आंबेकर, गोविंद चव्हाण, प्रा. बी. आर. पारसकर, संजय मनमाडकर, मनोज वाघमारे, दिलीप लोहार, गणराज साहेब, गजहंस भाऊ, सागर खैरे, सुग्रीव चौधरी, लक्ष्मण टोंपे, आबा तवार, दीपक मस्के, उमेश कापसे, राजू राऊत, राहुल सावंत, लक्ष्मण मुळे, सुभाष शुक्ला, तुकाराम साबळे पाटील, विश्वनाथ जाधव, दिलीप खरात आदींसह नागरिकांची उपस्थिती होती.

# संविधानाच्या आधारावर देशात लोकशाही टिकून : माजी आमदार रोहिदास चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महापुरुषाच्या जयंत्या उत्सव हा आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी ठेवा करून ठेवला आहे. लेखणीच्या स्वरुपात आठवण स्मरण कर्तृत्व कार्याचा आदर्श घ्यावा व स्वीकारावे हा त्यामागील उद्देश असतो.राष्ट्रीय सण, उत्सव, जयंत्या साजरा करण्याची आवड असली पाहिजे, संविधानाच्या आधारावरच देशात लोकशाही टिकून आहे असे प्रतिपादन शिवसेना उबाठा चे जेष्ठ नेते लातूर संपर्क प्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी व्यक्त केले. चिखलभोसी येथे दि.(३०) एप्रिल रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ.रोहिदास चव्हाण बोलत होते.प्रथमतःमान्यवरांच्या हस्ते महात्मा गौतम बुद्धांच्या मुर्तीचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. धुपपुजा पुष्प पुजा केल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते निळ्या व पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्रिशरण, पंचशील, सामुहिक वंदना घेण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फार महान आहे.भारतीय राज्यघटनेची निर्मिती म्हणजे जणू एक सर्वांसाठी नियमावली होय.ती तयार करण्यासाठी जगातील इतर देशांच्या घटनेचा अभ्यास करून,पोषक तत्वे एकत्रित करून लिखित राज्यघटना तयार करून देशाला अर्पित केली. त्या आधारावर ही लोकशाही टिकून आहे.अलीकडच्या काळात बद्दल होतो की काय? अशी जाणकारांना शंका येत आहेत. संविधानाप्रमाणे शासन, प्रशासन, न्यायव्यवस्था, लोकशाहीचा चौथा स्तंभ चालते. प्रत्येकाचा क्रम ठरवलेला आहे. सध्या लोकशाहीचा उत्सव चालू आहे परंतु किती दडपण सत्तेचा दुरुपयोग कायद्याचा धाक दाखवून ईडी सीबीआय निवडणूक नियमावली पायदळी तुडवली जात आहे. सरकार हे प्रसिद्धीच्या मागे लागलेले आहे, मोदी देश, मोदी सरकार,गॅरंटी हे कशासाठी? भारत सरकार म्हटलं तर यात काय वावगं ठरणार. ना पंधरा लाख खात्यात आले,ना दरवर्षी दोन करोड नौकरी,ना शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट,ना हमीभाव फक्त बेरोजगारी, महागाई,भ्रष्टाचार, आयात धोरण, प्रत्येक वस्तूवर अठरा टक्के जीएसटी हे सर्व सत्ताधाऱ्यांना विचारले पाहिजे. कुणी काही विचारले कि लगेच सीबीआय, ईडी वगैरेचा गैरवापर करून निवडणूक जिंकायची.

# आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी संघटित राहावे : सुनील पवार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारतीय राज्यघटनेचे निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळेच आज आमची प्रगती होत असुन भिमा कोरेगाव, सणसवाडी परिसरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी नालंदा बुद्ध विहाराच्या माध्यमातून धम्म चळवळ गतिमान केली असून कार्यकर्त्यांनी संघटित राहून समाजाच्या प्रश्नावर एकत्रितपणे काम करावे.असे मत नालंदा बुद्ध विहार सणसवाडीचे अध्यक्ष सुनील सुदामराव पवार यांनी व्यक्त केले.नालंदा बुद्ध विहार, सणसवाडी ता शिरूर जिल्हा पुणे येथे दिनांक २८ एप्रिल डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते सुदामराव पवार हे होते प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण व संवर्धन समितीचे सचिव रामदास लोखंडे यांनी ऐतिहासिक भीमा कोरेगाव भूमि ही आमची शौर्य भुमी असून दैनिक सम्राटचे संपादक दिवंगत



बबनराव कांबळे यांनी दैनिक सम्राट च्या माध्यमातून भीमा कोरेगाव परिसरातील आंबेडकरी चळवळीच्या कार्याला प्रसिद्धी व ऊर्जा देण्याचे काम केले. ज्येष्ठ नेते सुदामराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व कामगार बांधव नालंदा बुद्धविहाराच्या माध्यमातून संघटित होऊन धम्म चळवळीत प्रामाणिक पणे काम करत असल्याचे सांगून भीमा कोरेगाव विजयस्तंभ जागेवरील न्यायालयीन लढ्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन केले.भीम बुद्ध गीते सादर करून अनुयायांची मने जिंकली. सायंकाळी नालंदा बुद्ध विहार ते सणसवाडी गावातील प्रमुख रस्त्याने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीमध्ये बुद्ध ,भीम गिते सादर करण्यात आली. महापुरुषांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. ६ हजार अनुयायांने शांततेने या मिरवणुकीमध्ये सहभागी होऊन सामाजिक समतेचा संदेश दिला.धम्मउपासक गंगाराम गायकवाड यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस तसेच मिरवणुकीतील अनुयायांवर पुष्पवृष्टी करून फटाक्याची आतिषबाजी करुन स्वागत केले. विविध पक्षातील मान्यवर ग्रामस्थ व मोठ्या संख्येने कामगार बांधव , महिला विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. महेश डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिक्रापूर, सणसवाडीचे माजी उपसरपंच नवनाथ हरगुडे, राहुल दरेकर, सागर हरगुडे, संतोष नरके, भारतीय बौद्ध महासभेचे हवेली तालुका अध्यक्ष सुनिल अवचार,युवराज झेंडे, अड प्रविण पटेकर आदी मान्यवर उपस्थित होते.भीम जयंती सोहळा यशस्वी होण्यासाठी जयंती मंडळाचे विश्वनाथ घोडके,रवी कांबळे ,मालोजी भेदेकरतात्याराव मोरे, दत्ता माने, परमेश्वर निकम, अशोक माने, चंद्रकांत कांबळे, पद्माकर तरोडेकर, नरेंद्र खिल्लारे आदी पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मालोजी भेदेकर यांनी केले. आभार विश्वनाथ घोडके यांनी मानले.

# अमित शाहांचे खोचक उत्तर

आधुनिक केसरी

काही दिवसांपूर्वीच माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसला रामराम ठोकून भाजपात प्रवेश केला. यावेळी त्यांनी कोणतंही ठोस कारण दिलं नाही. अशोक चव्हाणांच्या भारतीय जनता पक्षातील प्रवेशामुळे काँग्रेसला नांदेडमध्ये मोठा धक्का बसल्याचं मानलं जात आहे. मात्र, एकीकडे अशोक चव्हाणांनी अचाकन भाजपामध्ये का प्रवेश केला? या प्रश्नाप्रमाणे भाजपानं भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या अशोक चव्हाणांना पक्षात का घेतलं? हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुलाखतीत उत्तर दिले आहे. लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यांचं मतदान पार पडले असून तिसऱ्या टप्प्यासाठी येत्या ७ मे रोजी मतदान होईल. त्या पार्श्वभूमीवर देशभराती १२ राज्यांमधल्या ९४ मतदारसंघांमध्ये प्रचाराचा धडाका सुरू आहे. केंद्रीय मंत्रीही यासंदर्भात वेगवेगळ्या प्रचारसभांमधून विरोधकांवर टीका करताना दिसत आहेत. अमित शाह यांनी 'एबीपी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये वेगवेगळ्या राजकीय मुद्द्यांवर भाष्य केलं. यावेळी भ्रष्टाचाऱ्यांना पक्षप्रवेश दिल्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यावर भूमिका स्पष्ट केली. मुलाखतीदरम्यान, अमित शाह यांना भ्रष्टाचारी नेत्यांच्या पक्षप्रवेशामुळे पक्षाच्या प्रतिमेला धक्का पोहोचत नाही का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर अमित शाह म्हणाले, असे अजिबात होत नाही. आम्ही पक्षप्रवेश दिल्यानंतर एकाही व्यक्तीविरोधातील प्रकरण मागे घेतलेलं नाही. सगळ्या केसेस चालू आहेत. न्यायालयासमोर आहेत. न्यायालयाला त्यावर सुनावणी घ्यायची आहे. सर्व प्रकरणांमध्ये आरोपपत्रंही सादर झालेली आहेत, असे अमित शाह म्हणाले. दरम्यान, राज्य सहकारी बँकेतील २५ हजार कोटींच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना क्लीनचिट मिळाल्याबाबत व खुद्द अजित पवारांना पक्षात प्रवेश दिल्याबाबत अमित शाह यांना यावेळी विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी हे प्रकरण वरवर पाहून चालणार नाही, अशी मोघम प्रतिक्रिया दिली. ही तपास प्रक्रिया आहे. जेव्हा गुन्हा दाखल होतो तेव्हा चार ते पाच प्रकारच्या गोष्टी एकत्र करून वेगवेगळी प्रकरणे दाखल होतात. पण जेव्हा भ्रष्टाचाराचे एक मोठे प्रकरण दाखल होतं तेव्हा इतर लहान-मोठी प्रकरणे आपोआप रद्द होतात आणि सर्व मिळून एक मोठे प्रकरण एकत्रितपणे ती तपास यंत्रणा चालवते. त्यामुळे या घडामोडी इतक्या वरवरपणे पाहणे चुकीचे असून त्याच्या खोलात जाऊन पाहायला हवे, असे अमित शाह म्हणाले.



बळीराम शेषेराव चव्हाण
संपर्क क्र. ९०२८४४६९४२

# घटणारे मतांचे प्रमाण कोणास हानिकारक ?

आधुनिक केसरी

**भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये कोणत्याही संघर्षाशिवाय व कोणतेही जात, धर्म, पंथ, लिंग किंवा सामाजिक समूह न पाहता सर्वांनाच मतदानाचा अधिकार भारत स्वतंत्र झाला तेव्हाच देण्यात आला. भारतीय राज्यघटनेने या देशातील सर्वसामान्यांपासून तर उच्चवर्गीयांपर्यंत (प्रस्थापित) सर्वांना समान मतदानाचा अधिकार घटनेतील कलम 326 नुसार 'घटनात्मक अधिकार' म्हणून बहाल केला आहे.**

परंतु या विरुद्ध विचार केला तर ज्या देशाला आपण लोकशाहीची जननी म्हणतो, त्या ब्रिटनमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार १९२८ मध्ये देण्यात आला. तसेच जगाची महासत्ता म्हणून ओळख असणाऱ्या अमेरिकेने १९७६ ला ALL MEN ARE BORN FREE AND EQUAL हे सूत्र घेऊन राज्यघटना स्वीकारली गेली.

परंतु स्त्रियांना मतदानाचा अधिकार १९२० मध्ये देण्यात आला. या प्रगत देशांचा विचार केला असता आपला भारत देश जो १५० वर्ष इंग्रजांच्या गुलामीत होता या गुलामीतून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला, त्याच दिवशी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान मतदानाचा अधिकार बहाल केला.

लोकशाही शासन व्यवस्थेने आपल्याला जो मतदानाचा अधिकार दिलेला आहे; त्या अधिकाराचा योग्य रित्या वापर करून आपण परिवर्तनशील भारत व सुशासन निर्माण करू शकतो. मतदान हे आपले केवळ हक्कच नव्हे तर त्याला आपण आपले कर्तव्य देखील समजले पाहिजे. त्यामुळे देशाच्या विकासामध्ये आपण फक्त हक्काचीच भाषा न वापरता कर्तव्य पालन देखील शिकायला हवे. शिवाय देशाची दशा आणि दिशा समजून घेऊन सुशिक्षित नागरिकांनी जागरूक राहणे आणि मतदान करणे हेच समाज परिवर्तनाचे किंवा देशाची भावी दिशा ठरवण्यासाठीचे योग्य मार्ग आहे असे म्हणायला हरकत नसावी.

आजच्या परिस्थितीत भारत देशामध्ये लोकशाहीच्या सर्वात मोठा सण साजरा होत आहे. हा सण म्हणजे दर ५ वर्षांनी येणारा सण म्हणून ओळखला जातो. या सणात प्रत्येक जाती-धर्माचे लोक आनंदाने सहभाग घेऊन हा सण उत्साहाने पार पाडत असतात. २०२४ साली १८ व्या लोकसभेचा आपण सण साजरा करतो आहे. ही लोकसभा निवडणूक एकूण सात टप्प्यांमध्ये पूर्ण होत असून; १९ एप्रिल २०२४ रोजी पहिला टप्पा पूर्ण झाला. या टप्प्यात भारतीय निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार ५५.२९% मतदान महाराष्ट्रात तर ६५.५ टक्के देशात मतदान झाले आहे. तर २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रात ५३.५१% महाराष्ट्रात तर देशात ६१% मतदान झाले आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याला आपण सुशिक्षित, साक्षर, सर्व सुविधायुक्त असा राज्य म्हणून ओळखतो. परंतु भारतातील एकूण राज्यांचा विचार केला असता महाराष्ट्रात सातत्याने मतांची टक्केवारी घसरत आहे. पहिल्या टप्प्यांमध्ये त्रिपुरा हा छोटासा राज्य सर्वाधिक ७९.९०% मतदान करतो. त्याचवेळी बिहारमध्ये सर्वात कमी ४७.४९% मतदान होते. तर दुसऱ्या



टप्प्याचा विचार केला असता याही टप्प्यात सर्वाधिक मतदान ७७.५३% हे त्रिपुरा या राज्यात होतो तर सर्वात कमी उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये ५२.७४% मतदान झाले आहे. आपण जर वरील आकडेवारीकडे लक्षपूर्वक पाहिले असता असे जाणवते की, भारत देशात पहिल्या टप्प्यापेक्षा २ ते ३ टक्क्यांनी मतदान दुसऱ्या टप्प्यात कमी झाले आहे. म्हणजे मतदानाच्या टक्केवारी सातत्याने घट होताना दिसते आहे. ही घट नेमकं कोणत्या कारणामुळे होत आहे, याचा जर आपण विचार केला तर असे लक्षात येते की, १) प्रचंड तापमान - सध्या देशात प्रचंड तापमान जाणवत आहे, उष्णता अधिक आहे, उष्माघात होण्याचे प्रमाण अधिक आहे त्यामुळे मतदानावर त्याचा परिणाम होताना दिसतो. २) उन्हाळा म्हटलं की लग्न आले, म्हणजेच काय तर सध्याच्या परिस्थितीत लग्न सराई असल्यामुळे देखील मतदानावर परिणाम होत आहे असं निवडणूक आयोगाच्या सदस्यांनी सांगितले आहे. ३) प्रचंड नैराश्यता - भारतातील मतदारांमध्ये राजकीय पक्षातील नेत्यांबद्दल रोष आहे. या रोषाचा परिणाम म्हणजे मतदान करण्यात उत्साहाचा अभाव जनतेत दिसून येतो. ४) शहरी भागात सर्वाधिक उदासीनता - शहरी भागातील मध्यमवर्गीय लोक संपत्ती कमावणे व घर-प्रपंच चालवण्यात व्यस्त आहेत. त्यांना या मतदानाशी काही एक संबंध नसल्यासारखे दिसते. मतदानाच्या दिवशी सुट्टी भेटली म्हणून 'पर्यटन' करतात. त्यामुळे देखील शहरी भागात मतदानाचा टक्का घसरताना दिसून येतो. ५) धार्मिक द्वेष - आज भारतात प्रचंड प्रमाणात जातीय, धार्मिक द्वेष राजकीय पक्षांकडून पसरवले जात आहे. त्यामुळे देखील मतदार मतदानापासून लांब राहण्याचा प्रयत्न करत आहे. ६) पक्षाचे केंद्रीकरण - आज भारतामध्ये जवळपास कमी-अधिक प्रमाणात सर्वच पक्ष केंद्रीय पद्धतीने निर्णय घेत आहे. हुकूमशाही पद्धतीने एकला चलो ही भूमिका घेताना दिसते आहे. त्यामुळे देखील मतदार या केंद्रिकरणास फाटा देत मतदान न करण्याचा विचार करत असल्याचे दिसून येते. ७) सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रात मागील दोन वर्षात महाराष्ट्रात लागलेली कीड; पक्षांतर्गत बंड यामुळे जनता त्रासली आहे. हे राजकीय नेते मंडळी स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष फोडून गटा-तटाचे राजकारण करत आहे. एका पक्षातून फुटून दुसरा गट निर्माण केला जातं आणि त्यावेळी ते सांगतात की, "आम्ही विकासासाठी इकडे आलो". म्हणजे याचा अर्थ त्यांनी त्या अगोदर काहीच केले नाही नुसते आश्वासन दिले. याशिवाय २०२४ च्या निवडणुकीत अनेक भाजपचे नेते राज्यघटना बदलणार असे बोलत असल्यामुळे आरक्षण जाण्याच्या भीतीने देखील सामान्य जनता मतदानापासून वंचित राहत असल्याचे सांगितले जाते.

सातत्याने घटणाऱ्या मतदाना विषयी उपाययोजना म्हणून निवडणूक आयोग असेल किंवा राजकीय पक्ष यांनी प्रत्येक तांडा, वाडी, वस्ती व शहरांमध्ये मतदान जागृती घडवून आणली गेली पाहिजे. मतदानाच्या आधीकाराबाबत व त्याचा योग्य वापर केल्यास काय होऊ शकतो, ह्या गोष्टी पटवून दिल्यास भविष्यात मतदानाची टक्केवारी वाढू शकेल.

सातत्याने मतदानात होणारी घट ही आजपर्यंतचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, याचा सर्वाधिक तोटा भारतीय जनता पक्षाला सहन करावा लागला आहे. १९९९ साली ५९.९९% मतदान झाले व भाजपचे १८२ सीट आल्या होत्या. २००४ साली ५८.०७% मतदान व १३८ सीट आले. २००९ साली ५८.२१% मतदान व ११६ सीट आल २०१४ साली ६६.४४% मतदान व २८२ सीट आले. २०१९ साली ६७.४०% मतदान व ३०३ सीट आलेल्या होत्या. २०१४ व २०१९ अपवाद वगळता त्यापूर्वी ५० ते ५८% च्या आसपास मतदान होत असे; परंतु या दोन्ही वर्षी मतांची टक्केवारी वाढली होती. त्यामुळे याचा फायदा भाजपला झाला होता. त्यामुळे याही वर्षी जर मतदानाचे प्रमाण पहिल्या व दुसऱ्या टप्प्यासारखेच पुढील पाच टप्प्यात मतदानात घट झाल्यास भाजपला याच्या परिणामास सामोरे जावे लागेल असे राजकीय विश्लेषक सांगतात. मतदान सर्वाधिक झाल्यास कोणत्या पक्षाला अधिक फायदा होईल किंवा कोणत्या पक्षाला तोटा होईल, यापेक्षा सुदृढ लोकशाहीसाठी व लोकशाही जिवंत राहण्यासाठी १००% मतदान होणे अपेक्षित आहे. परंतु या दोन टप्प्यातील आकडेवारीचा अंदाज पाहता मतदार हे जुन्या आकडेवारीकडे येऊ पाहत असल्याचे दिसते. आणि हे सातत्याने घडणारी मतांची आकडेवारी लोकशाहीसाठी मारक नक्कीच ठरेल. त्यामुळे निवडणूक आयोगाने देखील राहिलेल्या पाच टप्प्यांमध्ये मतांची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# सोयीस्कर अर्थ काढणे म्हणजे ज्ञानाचा यथार्थ होत नाही

आधुनिक केसरी

**ज्ञानाचा तत्वज्ञानाचा वास्तविक यथार्थ समजला तर आयुष्याच कल्याण झाल्याशिवाय राहत नाही.पण आपण यथार्थ शोधण्याच्या भानगडीत पडत नाहीत हेच दुर्दैव आहे. आपल्याला हवा तसा सोयीचा सोईस्कर होईल तो अर्थ बोध काढण्यात मात्र आपण तरबेज असतो.पण हाच तरबेज पणा आपल्या स्वतःच्या अथवा समाजाच्या पण कामी येत नाही.दिशाहिन अर्थ कोणती नवी आणि योग्य दिशा देवू शकेल.प्रत्येक विषयाशी संबंधित निगडित ज्ञान तत्वज्ञान हे मुळ स्वरूपात सुसंगत असतं.पण आपण जेव्हा त्या क्षेत्रातील ज्ञानाचा अर्थ काढण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मुळ अर्थ सापडला अथवा शोधता आला तर उपयोग असतो.**

अन्यथा फक्त मानसिक समाधाना पलिकडे फार काही उल्लेखनीय साध्य होत नाही.कारण आपल्या सोईच ज्ञान आणि मुळ ज्ञान यामध्ये जमिन असमानाच अंतर असतं.मुळ ज्ञानाचा वास्तव अर्थ म्हणजे यथार्थ आपल्याला शोधता आला तरच हे जमिन असमानाच अंतर संपुष्टात येईल.ज्ञान हे सृष्टीच्या कल्याणार्थ असतं मुळ ज्ञान तत्वज्ञान हे सर्वसामान्य माणसाला समजलं पाहिजे ते समजण गरजेचं आहे.हेच ज्ञान सोप्या भाषेत सांगताना अथवा लोकांना समजविण्यासाठी आज वेगवेगळ्या क्षेत्रात मोठी फौज निर्माण होत आहे.अशी फौज निर्माण होणं हे जरी कौतुकास्पद असलं तरी सुद्धा मुळ ज्ञानाचा यथार्थ लोकांना समजावणं हे खुप महत्वाचे आहे.अन्यथा मुळ ज्ञान दुर रहिल आणि त्याचा फारसा उपयोग पण होणार नाही.म्हणजे मुळ वास्तविक अर्थ जो ज्ञानाला अपेक्षित असतो. दुर्दैवाने अर्थ काढणारा आपल्या सोयीनुसार काढतो. मग मुळ गुणवत्ता तर संपुष्टात येईलच आणि या उलट निर्माण झालेल ताकलादू ज्ञान जे अर्धवट अथवा दिशाहिन असेल ते उपयोगी कसे पडेल. ज्ञानाचा यथार्थ काढलं तर ते ज्ञान आपल्यासाठी अमृत ठरेल आणि इतरांसाठी देखिल ते अमृत म्हणून कामी येईल पण आपण खरंच असं करतो का ?आपण खरंच यथार्थ शोधतो का तर नाही शोधताना आपल्याला मुळात यथार्थ अपेक्षित नसतोच मुळी म्हणून आपण आपल्याला जसा वाटतो तसाच अर्थ बोध काढतो.म्हणजेच आपल्या विचारांनाशी मिळत जुळत अनुकूल अशा पद्धतीने मोडुन तोंडुन आपल्या जिथे जे अपेक्षित होतं तिथेच मुळ अर्थ घेऊन येतो.हाच अर्थ आपल्यासाठी तसंच इतरांसाठी देखिल गुणकारी नसतो.मुळ ज्ञान तत्वज्ञान काय सांगत आहे त्याचा मतीत अर्थ काय आहे याच्याशी आपल्याला फार काही देणंघेणं नसतं आपण ज्या पद्धतीने विचार करतोय त्याच पद्धतीने ते ज्ञान त्या पठडीत कसं बसवता येईल आणि ते इतरांवर कस बिंबवता येईल हाच आपला उपक्रम असतो.म्हणून आपण काढलेला अर्थ अगोदर स्वतः वर व नंतर इतरांवर बिबंविण्याचा प्रयत्न करत असतो.हिच बाब गोष्ट बहुतांश अनेकांच्या बाबतीत घडतेय त्या मुळे मुळ ज्ञान तत्वज्ञान फार दुर राहुन गेलं आहे.आणि आपण त्याची तोड फोड करून त्या मुळ ज्ञानाच पार भंगार केलं आहे.मग समाज असो वा समाज व्यवस्था भगांरातुन काय बोध घेईल मुळ ज्ञान भगांर अवस्थेत जाण्यासाठी इतर कोणीही नाही तर आपण स्वतःच जबाबदार आहेत.त्याचे दुष्परिणा मात्र समाजाला भविष्यातील पिढ्यांना नक्कीच भोगावे लागतील.मुळात ज्ञान आणि तत्त्वज्ञान हे आपल्या सोयीनुसार अर्थ काढण्यासाठी नसतं तर त्या मधील यथार्थ शोधण गरजेचं असतं आपल्याला यथार्थ सापडला नाही शोधता आला नाही तरी हरकत नाही पण चुकीची पेरणी करून योग्य फळ पिक पदरात कसं पडणार उलट बी खतपाणी मेहनत आणि जमिनीचा पोत वाया जाईल. हे धुतल्या तांदळासारख स्वच्छ आणि परखड सत्य आहे.आपण मुळ यथार्थ शोधत नाहीत म्हणून खरया तत्वज्ञान पासुन आपणही वंचितच राहतो. आणि आपल्या सोयीनुसार अर्थ काढुन मुळ आणि यथार्थ या मध्ये गोंधळ करून ठेवतो हे कुठेतरी थांबायला हवा आणि यथार्थ ज्ञान शोध आणि बोध घेण गरजेचं आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लोकशाहीच्या नावाखाली हुकूमशाही खपवून घेणार नाही

## ॲड. असिम सरोदे : मोदी- शहांच्या प्रवृत्ती विरोधात सासवड येथे 'निर्भय बनो सभा'

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आपला प्रवृत्तीला विरोध असला पाहिजे. नरेंद्र मोदी,अमित शहा दोन आकृत्या आहेत. दोन माणसं आहेत.त्यांचे चेहरे आहेत.पण अशी कोणतीही माणसं असतील तर त्यांच्या प्रवृत्ती बद्दल आपण बोललं पाहिजे.माझ्या वडिलांनी जेव्हा इंदिरा गांधींच्या विरोधात आंदोलन केलं.त्यावेळी १३ महिने जवळपास तिहारच्या तुरुंगा मध्ये होते.तेव्हा त्यांचा हुकूमशाहीलाच विरोध होता आणि माझा सुद्धा हुकूमशाहीला विरोध आहे.लोकशाहीच्या नावाखाली आम्ही हुकूमशाही खपवून घेणार नाही. हे खडसावून सांगणाऱ्या लोकांची संख्या मोदींच्या गैरकारभारामुळे,मोदींच्या खोटारडेपणामुळे, अंधश्रद्धा पसरविल्यामुळे आणि अवैज्ञानिक पद्धतीचे बेताल वक्तव्य केल्याने भारतभर वाढलेले आहेत. असे संविधान विश्लेषक व कायदेतज्ज्ञ ॲड.असिम सरोदे यांनी म्हटले.ते सासवड ता.पुरंदर येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या निर्भय बनो सभेतून बोलत होते. यावेळी विचारमंचावर सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी,रावसाहेब पवार,ॲड.बाळकृष्ण निढाळकर उपस्थित होते.राष्ट्रसेवा दलाच्या वतीने गाण्याचे सादरीकरण करण्यात आले.दांडा चालला हो,तोड चाकोरी या गाण्यातून वास्तव परिस्थिती मांडण्यात आली.तसेच सत्तेची खुर्चीवतर सरकारच्या विविध आश्वासनांचे फुगे लावण्यात आलेले होते.या फुग्यांचवर स्मार्ट सिटी,डाळीची आयात,कांद्याचे निर्यात धोरण,शिक्षणाचे धोरण,१५ लाख रुपये,शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्न,सार्वजनिक मालमता सुरक्षित,२ कोटी नोकऱ्या,महिला धोरण आदी लिहिले होते.हे सर्व फुगे फोडत सरकारवर टीका करण्यात आली.



ॲड.असिम सरोदे म्हणाले की,भारतीय समाज हा कोणाच्यातरी नादी लागणारा आहे.कोणाच्या पायावर सतत लीन होणारा आहे.हे ओळखुनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान भारताला आपल्या प्रति समर्पण करताना धोक्याची सूचना दिली होती की,यानंतर भारतामध्ये जर कोणी असा नेता झाला,आणि त्याच्या पायावर लीन होणारा समाज निर्माण झाला तर लोकशाही धोक्यात आली आहे.असे समजा.तो इशारा नरेंद्र मोदींनी खरा केला आहे.हा माणूस एकप्रकारे हुकूमशाहीचे तंत्र लोकशाहीला कशाप्रकारे बाटवू शकतं, उद्धवस्त करु शकतं याचे उदाहरण हे आहे.त्यांनी भारतामध्ये एक झुंड तयार केली.तसा भारत हा देश झुंडप्रधानच आहे.असे सुद्धा त्यांनी सांगितले. पुढे ॲड.असिम सरोदे यांनी सांगितले की,आपण लोकशाही कधी व्यवस्थित प्रकारे कधी स्वीकारलीच नाही.आपण संविधान कधी समजून घेतलं नाही.अनेक लोकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या हातात संविधान आहे.आणि तो पुतळा आहे.एवढाच आपला संविधानाशी संबंध आहे.संविधान कधी आपण वाचत नाही.आपले अधिकार आपण कधी जाणून घेत नाही.

अधिकारांपेक्षा सर्वात महत्वाचं म्हणजे कर्तव्याची जाणीव नसलेला समाज म्हणुन भारताची ओळख जेव्हा जगामध्ये होते.तेव्हा आपल्याला वाईट सुद्धा वाटत नाही.म्हणून कर्तव्य आणि अधिकारांची भावना एकत्रितपणे संविधानाचा आवाज असू शकतो.त्यानिमित्ताने लोकशाहीचं प्रशिक्षण आपलं झालं पाहिजे.

मोदजींनी हिंदु मुसलमान याच्या मध्ये जो भेदभाव निर्माण करण्याचा,विषमता जास्त अधोरेखित करण्याचं काम केलेलं आहे.त्याच्यातून भारतामध्ये सलोखा निर्माण होण्याची प्रक्रिया पूर्णपणे २०१४ पासून थांबविण्यात आलेली आहे.ही प्रक्रिया त्यांनी गुजरातमध्ये २००३ पासून थांबविली आहे. आम्हांला माहीती होतं, बऱ्याच लोकांना माहीती होतं,विषारी प्रवृत्तीचा हा माणूस आहे.मुख्यमंत्री असताना हे जेव्हा अमेरिकेत जाणार होते.तेव्हा अमेरिकन सरकारने ह्यांना व्हिसा नाकारला होता. तुमचा सारखा माणूस आमच्या अमेरिकेत येऊ शकत नाही ह्यांना पंतप्रधान पदावर आपण सगळ्यांनी बसविले आहे.आपल्या सगळ्यांची प्रतिष्ठा ह्यांच्या मागे चिकटल्यावर ह्यांना अमेरिकेने येण्याची परवानगी दिली आहे.असे सुद्धा ॲड. असिम सरोदे यांनी सांगितले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी यांनी सुद्धा मनोगत व्यक्त करत मोदी शहांच्या कारभारावर ताशेरे ओढले.तसेच संविधानातील मूल्यांबाबत ही विशेष जागृती घडवून आणली.या सभेला सासवड नगरी सह आसपासच्याच्या भागातून आलेले लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोदी शहा यांना सत्तेतून बाहेर केलं पाहिजे :डॉ .विश्वंभर चौधरी

गेली वर्ष भर "निर्भय बनो"च्या माध्यमातून ॲड .असिम सरोदे आणि डॉ .विश्वंभर चौधरी हे मोदी शहांच्या हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात बोलत आलेले आहेत .सासवड येथे झालेल्या सभेतून सुद्धा सामाजिक कार्यकर्ते डॉ .विश्वंभर चौधरी यांनी परखड पणे टीका केली . गेल्या दहा वर्षात काय काय घडले याची उदाहरणे त्यांनी लोकांसमोर मांडली .पुलवामा असो, काश्मीर प्रकरण असो किंवा मणिपूरचा विषय असो यांसारखे अनेक विषय घेत त्यांनी सरकार वर टीका केली . शिवाय भाजपला मतदान करू नका म्हणून सुद्धा आवर्जून सांगण्यात आले . डॉ .विश्वंभर चौधरी म्हणाले,या महाराष्ट्रात ४५७ शेतकऱ्यांनी गेल्या दोन महिन्यांत आपलं आयुष्य संपविलेलं आहे .मागच्या वर्षात एकट्या बीड जिल्ह्यात २५७ आत्महत्या झाल्या .या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांशी आपण काही घेणं देणं लागत असू तर आदी मोदी शहा यांना सत्तेतून बाहेर केलं पाहिजे .त्याचे कारण हे शेतकऱ्यांचे सरकार नाही, असे सुद्धा त्यांनी सांगितले .



# जगाला संत परंपरेची आणि संस्कृतीची शिकवण देणारा महाराष्ट्र देशाचा गौरव

## आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. देशाच्या प्रत्येक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही महाराष्ट्राने योगदान दिले आहे. ही संतांची भुमी आहे. संतांनी महाराष्ट्रातून दिलेले समाजोपयोगी विचार समाजाने स्वीकारले असून संत परंपरेची आणि संस्कृतीची अमुल्य शिकवण जगाला देणारा महाराष्ट्र देशासाठी गौरव असल्याचे असल्याचे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

1 मे महाराष्ट्र दिनानिमित्त चंद्रपूर येथील तहसील कार्यालय येथे सकाळी 7 वाजता आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, नायब तहसीलदार राजू धांडे, नायब तहसीलदार प्रियंका मानकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आज 1 मे रोजी राज्यभरात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चंद्रपूर येथील तहसील कार्यालयातही महाराष्ट्र दिनानिमीत्त ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते येथील ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण होताच उपस्थितांनी तिरंग्याला सलामी देत महाराष्ट्र गीत गायले.

अनेक आव्हानांचा सामना करत आज महाराष्ट्र राज्य देशातील सर्वात विकसित राज्यात अव्वल क्रमांकावर आहे. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण, शेती, क्रीडा, परंपरा, तंत्रज्ञान या सर्वच बाबतीत महाराष्ट्रानं नेत्रदिपक कामगिरी केली आहे. महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. देशाच्या प्रत्येक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला असल्याचे ते यावेळी म्हणाले. या प्रसंगी तलाठी, मंडळ अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, पोलीस पथकाची उपस्थिती होती.

# कवी, शिक्षक, अभिनेते विनोद जैतमहाल यांची दिलखुलास मुलाखत रंगली

## आयुष्यात नवे प्रयोग करण्याचा प्रवास सुरूच राहील

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** एक व्यवसाय करत असताना नवीन छंद जोपासून त्याचे व्यवसायात रूपांतर करावे अशा प्रकारे आजवर अनेक व्यवसाय करत आलो आणि यापुढेही नवीन कौशल्ये शिकण्याचा प्रवास सुरूच राहील, असे अनुभवकथन प्रसिद्ध कवी, शिक्षक, नाट्यकलावंत, भाषा अभ्यासक विनोद जैतमहाल यांनी शिक्षक साहित्य संमेलनात बोलताना केले. जिल्हा परिषद शिक्षण माध्यमिक विभागाच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त 29 एप्रिल रोजी आयोजित शिक्षक संमेलनात विनोद जैतमहाल यांची प्रकट मुलाखत नाट्यकलावंत मुकुंद दुसे व कवयित्री डॉ. विद्या दिवटे यांनी घेतली.

**कृषी विज्ञान केंद्र 'आमची शाळा' प्रांगणात संमेलन :** शिक्षक साहित्य संमेलनात कवी-शिक्षक, नाट्य कलावंत विनोद जैतमहाल यांची विशेष मुलाखत रंगली. मुलाखतीत प्रिंटिंगच्या व्यवसायापासून कम्प्युटर दुरुस्तीपर्यंतच्या व्यवसायाचा सुरुवातीचा अनुभवपट मांडला. पत्रकारिता ते व्यावसायिक नाटक करीत मराठी, हिंदी, इंग्लिश, उर्दू भाषेसह संस्कृत भाषेचा अभ्यास कसा होत गेला हा प्रवासही जैतमहाल यांनी उलगडला.

**रंजक किस्से व समृद्ध अनुभवकथन :** शिक्षक व कंटेंट लेखक म्हणून लेखन करताना गीतकार विनोद जैतमहाल ही ओळख कशी मिळाली, याचे दिलखुलास किस्सेही मुलाखतीत त्यांनी सांगितले. वर्धा जिल्ह्यातील आष्टी गावातील स्वातंत्र्यलढ्यावर एक लघुपट लिहिला व त्यात गाणीही लिहिली. त्या दरम्यानचा अनुभव एका प्रश्नाच्या उत्तरादाखल सांगितला. जीवनातील अविस्मरणीय घटनांपैकी एक घटना म्हणजे गीतकार जावेद अख्तर यांच्यासाठी उर्दू मानपत्र लिहिण्याचे भाग्य मिळाले, हे विनम्रपणे कवी जैतमहाल यांनी नमूद केले. 'शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला' या नाटकातील शाहीर मिलिंद कांबळे या भूमिकेची तयारी कशी केली, आदी विविध प्रश्नांना जैतमहाल यांनी समर्पक आणि प्रांजळ उत्तरे दिली. कवयित्री डॉ. विद्या दिवटे, रंगकर्मी मुकुंद दुसे यांनी घेतलेल्या मुलाखतीत जैतमहाल यांनी वीररसातील अनेक गाणी व कविता सादर करून श्रोत्यांचे मनोरंजनही केले.



# सावळदबारा येथे महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांचा प्रचाराचा नारळ फुटला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन करून प्रचाराचे नारळ पदाधिकारी यांच्या हस्ते फोडण्यात आले.सोयगाव मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार तथा केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवेंनी प्रचार शुभारंभ प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले व निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला. याप्रसंगी जरंडी येथे झालेल्या प्रचार सभेत नामदार दानवेनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी मंचावर राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार, आ. सांडू पाटील लोखंडे, जालना मा प्रभारी एजाज देशमुख, प्रदेश चिटणीस सुरेश बनकर,भाजपा जयप्रकाश चव्हाण VJNT, प्राचार्य नारायण कोलते पाटील, उत्तम चव्हाण पुढारी, अनुसूचित जाती जमातीचे तालुका अध्यक्ष शांताराम खराटे, शरीफ तडवी, मुंकुदा मानकर, तालुका अध्यक्ष गणेश लोखंडे, माजी सरपंच मोरसिंग चव्हाण, सरपंच वरदानसिंग चव्हाण, सुरेश चव्हाण सरपंच, जालना जिल्हाध्यक्ष बद्रिनाथ पठाडे, भास्करराव दानवे, रामेश्वर भांदरगे, भाजपचे जेष्ठनेते शिवाजीराव,ठगन भागवत यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेच्या उपस्थितीत अनेक कार्यकत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. नामदार रावसाहेब दानवे यांच्या हस्ते पुष्पहार व शाल देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य जेष्ठ नेते शिवाजीराव बुढाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जीवन कोलते पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महायुतीची पदाधिकारी व कार्यकत्यांनी परिश्रम घेतले.



**विकासाची गंगा सामान्यापर्यंत पोहोचत आहे- मंत्री अब्दुल सत्तार :** केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या जात आहेत . नामदार दानवेंच्या प्रयत्नाने जालना-जळगाव रेल्वेचा प्रश्न मार्गी लागलाआहे . मतदार संघातील लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे म्हणून जलजीवन मिशन अभिमान, डांबरीकरण आणि सिमेंट रस्त्यांचा विकास, मातोश्री पांदण रस्ता, शेतकरी सन्मान योजना, घरकुल योजना, तसेच अतिवृष्टी व दुष्काळासाठी शेतकऱ्यांना 17 हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई, भविष्यात गाव तेथे गोडाऊन ही संकल्पना राबविण्यात येणार आहे . ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर खली जात आहे . त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून विकासाची गंग सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पोहोचत असल्याचे मत राज्याचे मंत्री अब्दुल सत्त पानी सांगितले . नेहमीप्रमाणेच मंत्री सत्तारआणि नामदार दानवेंमध्ये शेर शायरी आणि कलगीतुऱ्याचा सामना रंगला होता

# आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि कार्ल मार्क्स

आधुनिक केसरी न्यूज

**जगातील सर्व कामगारांचा दिवस म्हणून मे दिनांस काय महत्त्व आहे? यासाठी एक मे याच दिवसाची का निवड करण्यात आली? कामगारांच्या कार्य दिवसांची कहानी काय आहे? मे दिवसासाठी काय बलिदान द्यावे लागले? आणि यामध्ये कार्ल मार्क्स यांचे काय योगदान आहे? याविषयीची काही एक चर्चा आपण या लेखाच्या माध्यमातून करणार आहोत.**


एकाच ऐतिहासीक दिनी 'एक मे' रोजी 'आठ तासाचा कामाचा दिवस' असला पाहिजे, यासाठी झालेल्या संघर्षात प्राणांचे बलीदान देणाऱ्या शहिद बांधवांना अभिवादन करण्यासाठी एकत्र आलेल्या, भांडवलशाही शोषणाविरुद्ध १८०६ पासून सुरु झालेल्या या संघर्षात हजारो कामगारांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. शिकागोच्या 'हे मार्केट' स्वेअरमध्ये कामगारांच्या निदर्शनावर अमानुष हल्ला करण्यात आला. यामध्ये सहा कामगार म्रत्यमुखी पडले. यावेळी भांडवलदार, शासन पोलीस, फौजा, न्याय संस्था यांनी एकत्र येवून कामगार नेते अडाल्फ फिशर, ऑगष्ट स्पाईस, अल्बर्ट पारसन्स, जॉर्ज एंगेल यांना फासावर चढवले. शेवटी आठ तासाचा कामाचा दिवस कायद्याने झाला. 'हे मार्केट' येथील शहिद स्मारकावर पुढील शब्द कोरलेले आहेत, जे की कामगारांना आजही प्रेरणा देण्याचे काम करतात. 'एक दिवस असा येईल ज्या दिवशी आमची शांतता ही त्या आवाजापेक्षा ही अधिक शक्तीशाली असेल, ज्यास तुम्ही आज दाबण्याचा प्रयत्न करीत आहात.' हे कामगार बांधवांनी समजून घेतले पाहिजे.



डॉ. मारोती तेगमपुरे,
संपर्क : ९४२३९९३१३७

अमेरिकी साम्राज्यवादाच्या प्रभुत्वाखालील साम्राज्यवादाच्या नवं-वसाहतवादी धोरणाच्या विरुद्ध आपल्या देशातील कामगारवर्ग आणि लक्षावधी कष्टकरी जनता अथकपणे लढा देत आहे; तर आपल्या देशातील राज्यकर्ते हे आंतरराष्ट्रीय महामंडळाच्या वतीनं जागतिकीकरण व उदारीकरणाचं धोरण नेटाने राबवण्याचा प्रयत्न करीत असून सार्वजनिक क्षेत्रातील महत्वाचे व मौल्यवान उद्योग बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व आपल्या देशातील बड्या भांडवलदारांच्या पदरात टाकून त्या उद्योगांचा सत्यानाश करीत आहेत. म्हणून देशातील कामगारांनी व कष्टकऱ्यांनी सध्याच्या परिस्थितीला तोंड देण्याचे कार्य नेटाने पुढे नेले पाहिजे.

आज काळाचे चक्र उलट्या दिशेने फिरवली जात आहेत साम्राज्यवादी मनोवृत्तीतून आलेले जागतिकीकरण, उदारिकरण आणि खाजगीकरणाने (खाऊजा) मागील तीस - बत्तीस वर्षांपासून कामगार विषयक धोरणांवर पुर्णतः ताबा मिळवला आहे. देशातील आर्थिक धोरणाचे सूत्र देशाच्या सर्वांगिन आणि नियोजीत विकासावर केंद्रित राहिलेले नाही. तर खाजगी भांडवल बहुराष्ट्रीय कंपन्या, त्यांचे भारतीय भागीदार यांच्या सोयीस आणि त्यांचे हितरक्षण करण्यासाठी आखले जात आहे. देशांच्या मूलभूत गरजांची पूर्तता, रोजगार वृद्धी, गरीबी -विषमता कमी करणे या उद्दिष्टांना आता शत्रुवत मानले जात आहे. (उलट पक्षी या कालावधी देशातील आर्थिक विषमता कधी नव्हे ती इतक्या उच्च टोकाला गेल्याचे मत तज्ञ वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरून नोंदवत आहेत.) उलट बाजाराला बेलगाम बेबंद स्वातंत्र्य देणे, भांडवलदारांना स्वस्त / फुकट जमिनी, पाणी आणि नैसर्गिक संपदा बहाल करणे, कामगार कायदे शिथील करणे, मोडून तोडून टाकणे, त्यातील प्राण काढून घेणे, कामगारांचे कंत्राटीकरण करणे, एकूणच कामगार कायदे विषयक सेवा असुरक्षित करुन सोडणे. ज्यामुळे अप्रत्यक्षरित्या कामगारांचे अधिकचे शोषण करण्यास परवाना देणे. या बाबी सद्या भारतात सुरु आहेत. परिणामी १२ -१२ तास काम, अत्यल्प वेतन, नियमीतपणाचा अभाव, यामुळे शोषणाच्या अनेक जागा निर्माण करुन दिल्या जात आहेत. हा खाऊजा धोरणाचा विपरित परिणाम आहे. त्याचे खोलवर रुजलेल्या गंभीर परिणामांचे चटके आपण सहन करीत आहोत. देशात 'आत्मनिर्भर भारत'ची भाषा बोलली जात असली तरी, जोपर्यंत खाऊजा धोरणांचा त्याग करून जनकेंद्रीत धोरणाची आखणी करून, कल्याणकारी धोरणांची कास धरणार नाही तो पर्यंत आपण 'आत्मनिर्भर'तेकडे जाऊ शकणार नाही. आपण पहातो आहोत, आज रोजी देशातील आरोग्य क्षेत्राच्या मर्यादा (कोरोना काळ आठवा) चव्हाट्यावर आल्या आहेत. म्हणून आरोग्य तथा शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत तरी जनकेंद्रित धोरण आखणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी कामगारांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.



जवळपास सर्वच देशात कामगार संघटना स्थापन करण्याचा अधिकार मान्य झाला असून त्याआधारे कामगार संघटना स्थापन होवून कार्यरत आहेत. कामगार चळवळीचे फलीत म्हणजे भारतासह अनेक देशात कामाची स्थिती, कामाचे तास, मजुरीचे दर, रजा, आजार, बेकारीच्या काळातील तरतुदी व्यापक पातळीवर कामगार हिताच्या दृष्टीने करुन घेण्यात मोठे यश आले आहे. भारतासारख्या लोकशाही तत्वांची जोपासणा करणाऱ्या देशात कामगार संघटना आणि उद्योगधंद्याचे चालक यांच्यामध्ये सामुदायिक वाटाघाटी करुन वेतन करार होतात. त्यामुळे कामगार संघटनेचे अस्तित्व आणि त्यांच्या संघटीत आवाजाला अनन्यसाधारण स्वरुपाचे महत्व होते/आहे/असणार आहे.

ही जमेची बाजू असली तरी कामगार कायदे कमजोर करुन कामगारांच्या जीवनावर विपरीत परिणाम करणारे निर्णय घेतले जात आहेत /गेले आहेत. दुसऱ्या बाजूस कंपनीत नवीन कामगार भरती न करता कंपनीच्या गरजा आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून भागवल्या जात आहेत. एखादं काम करुन घेण्यासाठी दुसऱ्या एखाद्या संस्थेस तेवढ्यापुरता मोबदला देवून त्या कामाची पुर्तता करुन घेतली जाते. यावर अधिक भर देवून कंपनीतील प्रत्यक्ष कामगारांची संख्या कमीत कमी कशी राहील याची काळजी घेतली जात आहे. यासर्व घटनाक्रमाचा विचार करीत असताना आपली संघटीत शक्ती वाढवणे व त्याच बरोबर आपल्यातील कार्यतत्परतेचाही विकास घडवून आणणे गरजेचे आहे. तरच येणाऱ्या काळात कामगार एक संघटीत शक्ती म्हणून आपला काही निभाव लागू शकतो. श्रमिकांच्या कष्टकऱ्यांच्या जगाला प्रत्येकवेळी चक्रव्यूह भेदतच मार्गक्रमण करावे लागते. हे मार्गक्रमण करताना फक्त वेतनांचा आणि सुरक्षेचाच विचार करायचा नसतो. म्हणजे तो तर असतोच पण त्याशिवाय आत्मसन्मानाचा, स्वातंत्र, न्याय आणि बंधतुतेचाही विचार करायचा असतो / करावा लागतो. एक लांब पल्ल्याचा प्रवास असतो हा, तो करताना नुसतेच मैलाचे दगड मोजून चालत नाही. किंवा कापलेले अंतरही मोजून चालत नाही. या काळात जमेल तशी आत्मचिकीत्साही करावी लागते. त्या आधारे होणाऱ्या / केल्या जाणाऱ्या टिकेचे धनिही व्हावे लागते. तरच हा मार्ग अधिक सकारात्मक दिशेने जाण्याची शक्यता निर्माण होते. या लेखाचा समारोप करीत असताना आज मे दिनाचे औचित्य साधून हे सांगीतले पाहिजे की, कामगार युनियनमध्ये सदस्य होणारे, संघर्षाचा झेंडा खांद्यावर घेणारे श्रमिक, निवडणूकीच्या राजकारणात आपल्याच युनियनच्या पक्षाविरुद्ध का जातात. हा एक न सुटलेला प्रश्न आहे. कंपनीच्या गेटमध्ये, गेटवरच्या लढ्यात ते युनियनचे सदस्य असतात. कामगार / श्रमिक / कष्टकरी असतात. पण तीच व्यक्ती घरी, गल्लीत, गावात, शहरात जाते आणि जात, धर्म, प्रांत, पोटजात या विनाशकारी, आत्मघाती अभिनिवेशांनी प्रेरित होते. असे का होते / व्हावे / झाले? याचेही सर्वांगिन पातळीवरील चिंतन प्रत्यक्ष कामगाराने व त्यांच्या नेतृत्वानेही करण्याची नितांत गरज आहे. याबरोबरच आणखी एक बाब महत्त्वाची आहे. नेत्यांच्या, जातींच्या आणि धर्माच्या आधारावर स्थापित होणाऱ्या कामगार संघटना स्विकारलेल्या अस्मितेपुरत्याच मर्यादित राहतात. त्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टी येवू शकत नाही. ही दृष्टी येण्यासाठी वर्गीय जाणीव विकसीत व्हावी लागते. त्यासाठी कार्ल मार्क्स समजून घ्यावा लागतो, त्याने आपल्यासाठी घेतलेल्या भूमिका व केलेला त्याग समजून घ्यावा लागतो. आज आपण विकेंडचा आनंद घेतोत परंतु वीकेंडचा जनक कार्ल मार्क्सला मात्र विसरतो. आपणास अन्यायाचा अंत झाला पाहिजे व तो कामगार संघटनेने केला पाहिजे असे वाटते परंतु अन्यायाविरोधात लढा द्यावा असा संदेश देऊन अन्याय दूर झाला पाहिजे म्हणून कृती कार्यक्रम आखणारा मार्क्स मात्र विस्मृतीत जातो. शाळा ही बालकांची योग्य जागा आहे असं म्हणून बालकामगार ही चुकीची प्रथा आहे. मुलांना कंपनीत नव्हे शाळेत पाठवा असं प्रथम सांगणारा मार्क्स आपल्यासाठी कुणीतरी बाहेरचा असतो. कामगारांसाठी आठ तास काम, आठ तास आराम व आठ तास विरंगुळा हे सूत्र मार्क्स यांनी दिले हे आपल्यापैकी किती बांधवाना माहित आहे. तेंव्हा हे सर्व मुळातूनच समजून घेतल पाहिजे. आणखी एक बाब नोंदवून थांबतो. मार्क्सवाद भांडवलशाहीच्या आधी आला हा दावा काहीसा विचित्र वाटतो. पण हे लक्षात घेतल पाहिजे की, जेंव्हा जगाला भांडवलशाही माहित नव्हती तेंव्हा जगाला मार्क्सवाद माहित होता. म्हणून कामगारांनी कार्ल मार्क्स समजून घेतला पाहिजे. विशेषत्वाने देशातील कामगार, कष्टकरी, विविध क्षेत्रात कार्यरत असणारा कर्मचारी, शिक्षक - प्राध्यापक या बांधवांनी प्रथमतः हे समजून घेतलं पाहिजे की आम्ही सर्व कामगार आहोत. आज देशात सर्वत्र विविध टप्प्यात १८ व्या लोकसभेसाठीचे मतदान सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर कामगारांनी आपला सुज्ञपणा मत देताना बाळगला पाहिजे. आमचं कोण, आमचे हित पाहणारे कोण आणि आमच्या हितास बाधा पोहोचवणारे कोण. विशिष्ट मंडळींना अधिकचा लाभ पोहोचवणारे कोण याचा या निमित्ताने साकल्याने विचार करण्याची गरज आहे. कारण कामगारांची बुद्धीभेद करणारी मंडळी कार्यरत आहेत. कारण ते एकजूट श्रमशक्तीला घाबरतात. म्हणून असा बुद्धीभेद करणारे भांडवलदारांचे दलाल म्हणून, मालकांचे चाकर म्हणून सर्वत्र वावरत असतात. प्रत्येक गावात, शहरात संधिसाधू राजकिय पुढाऱ्यांनी कष्टकऱ्यांची, श्रमिकांची एकजूट होऊ नये म्हणून अमिषांचा पाऊस पाडला जात आहे. दुर्दैवाने यास आमचेच काही बांधव बळीही पडत आहेत. कामगार चळवळी विषयी आस्था बाळगणाऱ्या प्रत्येकानेच सुकोमल सेन यांचे 'हिस्ट्री ऑफ वर्कींग क्लास इन इंडिया' हे पुस्तक वाचलेच पाहीजे.



## लोह्यात विविध ठिकाणी महाराष्ट्र दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहर परिसरात विविध शासकीय निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था आदी ठिकाणी महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्र ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. लोहा तहसील कार्यालयात नांदेड दक्षिण मतदारसंघाचे आ. मोहन अण्णा हंबर्डे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. प्रारंभी तहसिलदार विठ्ठल परळीकर यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. लोहा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक केंद्रे यांनी राष्ट्रध्वजास सशस्त्र मानवंदना दिली. याप्रसंगी नायब तहसीलदार राजेश पाठक, अशोक मोकले, संजय भोसीकर, पेशकर जाधव, राहुल सुतार, सातपुते, मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल आदींसह बहुसंख्य कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ कार्यालयात केंद्र प्रमुख एस. एम. वंजारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी सूर्यकांत दाढेल, शिवराज पाटील पवार, प्रदीप कांबळे, पी. एस. हाटकर, विनायक सेवनकर, केशव पातळे, राठोड, शेळके सह बहुसंख्येने कर्मचारी हजर होते.

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात उप अभियंता शिवाजी राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शाखा अभियंता कुंभार, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक निरदुडे, कराड, श्रीमती डोईबळे, श्रीमती जाधव, गुद्दे मामा आदींसह कर्मचारी उपस्थित होते. पोलिस ठाण्यातील ध्वजारोहण पोलिस निरीक्षक ओम कांत चिंचोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सपोनि केंद्रे, रेखा काळे, उपनिरीक्षक विश्वदीप रोडे, मंगेश नाईक आदींसह बहुसंख्येने पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## खा. डॉ. सुजय विखे पुन्हा शेतकऱ्यांच्या कांदा व दूध दरावरून रोषाचे धनी !

### सुजय पर्व गाणे सुरू होताच जाब विचारण्यास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**कर्जत :** पाच वर्षापूर्वी झालेल्या निवडणूकीनंतर थेट दुसऱ्या निवडणूकीसाठी मत मागण्यासाठी कर्जत तालुक्यातील निमगांव गांगर्डा येथे खा. डॉ. सुजय विखे हे बुधवारी सकाळी पोहचले असता त्यांना संतप्त शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. शेतकऱ्यांची आक्रमकता पाहून विखे यांच्यावर तिथून काढता पाय घेण्याची नामुश्की ओढवली.

लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने खा. डॉ. सुजय विखे यांचा बुधवारी कर्जत तालुका दौरा होता. डॉ. विखे यांच्या दौऱ्यामध्ये निमगांव गांगर्डाचा समावेश नव्हता, मात्र बुधवारी निमगांव गांगर्डा येथील ग्रामदैवत कालभैरवनाथांचा यात्रोत्सव होता. यात्रोत्सवानिमित्त हजारो भाविकांची गर्दी होणार असल्याने तिच संधी साधून डॉ. विखे हे त्यांचा ताफा घेउन निमगांव गांगर्डा येथे पोहचले. मंदीरात जात दर्शन घेउन परतत असताना ताफ्या तील वाहनामध्ये सुजयपर्व हे गाणे लावण्यात आले. तिथूनच शेतकऱ्यांच्यारोषाला सुरूवात झाली. विखे यांनी पाच वर्षात गावाकडे लक्ष दिले नाही. एकही विकास काम केले नाही. दुध, कांद्याचे दर कोसळलेले असताना त्याविरोधात संसदेत



आवाज उठविला नाही. त्यामुळे निवडणूक सुरू झाल्यावर मते मागण्यासाठी त्यांनी गावात येण्याचे कारणच काय असा सवाल शेतकऱ्यांकडून करण्यात येत होता. गाभाऱ्यातून दर्शन घेउन बाहेर आल्यानंतर शेतकऱ्यांच्या जमावामध्ये डॉ. विखे आले. मोठा आरडा ओरडा सुरू झाल्यानंतर डॉ. विखे यांच्या अंगरक्षकाने विखे यांच्या भोवती जमलेल्या तरूणांना दुर केले. त्यानंतर डॉ. विखे हे तिथून निघून गेले.

## सिद्धेश्वरानंद महाराजांकडे दीड कोटींची संपत्ती, सोन्याचा मुलामा असणारे पावणेतीन लाखांचे घड्याळ



आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** नाशिक लोकसभा मतदारसंघात अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करणारे सिद्धेश्वरानंद गुरू स्वामी सोमेश्वरानंद सरस्वती महाराज यांच्याकडे जवळपास दीड कोटींची संपत्ती असून त्यांच्यावर ९५ लाखाचे कर्ज आहे. ६२ ग्रॅम सोन्याचा मुलामा असणारे पावणे तीन लाखांचे सोन्याचे घड्याळ आणि साडेचार लाखाचे ५६ ग्रॅमचे दागिने त्यांच्याकडे आहेत. नाशिक मतदारसंघात आधी अर्ज भरणाऱ्या शांतिगिरी महाराजांकडे तब्बल ३९ कोटींची संपत्ती आहे. त्या तुलनेत त्र्यंबकेश्वरच्या श्रीराम शक्तीपीठ संस्थानचे महंत सिद्धेश्वरानंद गुरू स्वामी सोमेश्वरानंद सरस्वती यांच्याकडे बरीच कमी संपत्ती आहे. पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या महाराजांकडे एक कोटी २५ लाखाची चल संपत्ती आहे. यामध्ये सुमारे ५६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि ६२ ग्रॅम सोन्याचा मुलामा असणाऱ्या घड्याळाचा समावेश आहे. बस, जेसीबी, टेम्पो, दुचाकी, आयशर टेम्पो अशी २२ लाखाची पाच वाहने आहेत. स्वामी सोमेश्वरानंद सरस्वती इंटरनॅशनल असोसिएशनचे संचालक म्हणून त्यांनी ४६ हजार रुपये शेअर्समध्ये गुंतवलेले आहेत. तर १६ लाख २५ हजार रुपये त्यांनी कर्जाऊ दिले आहेत. शहरात कामटवाडे येथे रो हाऊस त्यांनी खरेदी केले आहे. त्याची सध्याची किंमत सुमारे २१ लाख आहे. वाहने व तत्सम बाबींसाठी त्यांनी कर्ज घेतले आहे. त्यांच्यावर बँक, वित्तीय संस्था आणि अन्य संस्थांचे ९४ लाख ९५ हजाराचे दायित्व आहे.



# भाजपच्या तरुण कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**दाभाडी :** जालना जिल्हा काँग्रेस जिल्हाध्यक्ष मा.राजेंद्र देशमुख साहेब यांच्या उपस्थितीत दाभाडी येथील भारत भाऊ खाडे, घनश्याम हळदे, सचिन सदाशिव, यदुनाथ खैरे, राजू दाभाडे, योगेश रगडे, युवराज दाभाडे, अमोल मगरे, सुनील रगडे, अमोल खरात, दीपक दाभाडे, प्रदीप रगडे, कृष्णा रगडे, संतोष तायडे, राहुल तायडे, योगेश तुपे, सोपान हळदे, एकनाथ निहाल, कृष्णा पदोळ, सुनील निहाल, मनीष तायडे, संदीप तायडे, उद्धव हळदे आदी तरुण कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला असल्याची माहिती तालुका अध्यक्ष सोयगाव दिलीप देशमुख यांनी बोलताना दिली.

या सर्व तरुणांना पुढील वाटचालीस सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मा.राजेंद्र देशमुख, मा.आ.शिवाजीराव चोथे, मा.संतोष सांबरे, मा.आ.राजेश राठोड साहेब, डॉ. निसार देशमुख, मा.बबलू सेठ चौधरी, मा.जयप्रकाश चव्हाण, घुगे नाना, सुभद्राताई तिडके, कैलास चव्हाण, सुभाष मगरे, दीपक डोंगरे, राम शिरसाठ, विजय जऱ्हाड, ईश्वर भुजंग, गणेश भुजंग, मधुकर भुजंग, आखतर बागवान, इंगळे सर, उमेश निकम आदी पदाधिकारी उपस्थित होते, अशी माहिती दिलीप देशमुख यांनी सांगितले.

# रखरखत्या उन्हात अग्नितांडव!

## भोकर शहरातील प्रकार : पोलिस, नागरिकांची धावपळ

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सध्या उन्हाळ्याच्या अंतिम टप्प्यात सूर्य अक्षरशा आग ओकतो आहे.ऊन्हाच्या काहिलीने जीव कासावीस होत असल्याने शहरातील मुख्य रस्ते सामसूम झाले आहेत.अशा वेळी शहरातील मोंढा परिसरात बूधवारी (ता.एक) भरदूपारी अचानक धूरांचे लोट, अग्नी तांडव सुरू झाल्याने पोलिस आणि नागरीकाची एकच धावपळ सुरू झाली.अग्निशमन दलानी आग आटोक्यात आणली आहे. सूदैवाने यात कुठलीही जिवीतहानी झाली नाही.

उन्हाळ्याच्या प्रारंभी ढगाळ वातावरण आणि अधूनमधून उन्हाची तीव्रता जाणवू लागल्याने फारशा झळा बसल्या नाहीत.एप्रील महिन्यात अवकाळी पाऊस,वादळवारा आणि गारपीट झाल्याने प्रामुख्याने आंबा, फळबाग,  काही प्रमाणात सोयाबीन,उन्हाळी ज्वारीचे नूकसान झाले.त्यानंतर  उन्हाळ्याच्या अंतिम टप्प्यात तापमानात कमालीची वाढ होत गेली. सूर्य अक्षरशा आग ओकतो आहे. दूपारच्यावेळी शहरातील रस्ते सामसूम झाले आहेत.पाणी टंचाईचने डोके वर काढले आहे.ऊन्हाच्या तीव्रते पासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी थंड पेय, टरबूज, विविध फळांचा आस्वाद घेणं पसंत केले आहे. तापमानाचा फटका पशु,पक्षी,वन्यजीवालाहि बसतो आहे. सकाळीच उन्हाची तीव्रता जाणवत असल्याने नागरिक घरातच बसून राहण पसंत करीत आहे. अशा परिस्थितीत शहरात भरदूपारी मोंढा परिसरातील कापडाचे व्यापारी तथा बाजार समितिचे संचालक सारंग मूदंडा यांच्या दूकानाच्या पाठीमागे नंदू पस्तापूरे यांनी मोकळ्या जागेत ठेवलेल्या रबरीपाईपाला अचानक आग लागली.अग्नी तांडव सुरू झाले, धुराचे लोट आकाशात दिसू लागल्याने नागरिक आणि पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली.अग्नीश्यामक दलाच्या पथकाने वेळीच आग आटोक्यात आणली.यात सूदैवाने कुणालाही हानी पोहचली नाही.



# मत्स्योदरी विद्यालयात ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मत्स्योदरी विद्यालय लोणार भायगाव येथे मुख्याध्यापक डॉ. प्रभाकर शेळके यांनी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण केले व विद्यार्थ्यांना गुणपत्रके वाटप केली. या वेळी घनश्याम दगडे, शिवाजी चव्हाण, मोमीन शकील, रतनसिंग चरावंडे, विनोद गवळी, ज्ञानेश्वर शेळके, ज्ञानेश्वर कळसे, दिलीपराव पैठणे, सुरेश श्रावण मगरे, सुखदेव लबडे उपस्थित होते. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन नारायण शिंदे तर आभार प्रदर्शन विनोद गवळी यांनी केले.



# सरपंच आप्पाराव नलावडेंच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयांचे ध्वाजारोहण सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. एक मे महाराष्ट्र स्थापन दिन तथा कामगार दिना निमित्त येथे संस्था  ग्रामपंचायत, पोलिस चौकी, सोसायटी, शाळा ठिकठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय चे ध्वजारोहण सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, पोलिस चौकीचे ध्वजारोहण मुख्य जमादार विनोद बिघोत, सोसायटी चे ध्वजारोहण संचालक जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे, माजी सरपंच भिमराव नलावडे,ग्रापं सदस्य पोपट काटकर, उपसरपंच कारभारी नलावडे,अरुण गायकवाड, ज्ञानेश्वर टेलर, विठ्ठल नलावडे, पांडुरंग पाटील नलावडे,चेअरमन किशोर नलावडे, चांद पठाण, भाऊसाहेब नलावडे, सय्यद लाल टेलर, उत्तम गवळी, पोलिस पाटील कारभारी नरवडे, सचिव जाधव, ग्रामविकास अधिकारी एबी बनसोड, पोलिस कॉन्सटेबल सपकाळ,बनसोड, संतोष पुंड, मोईनोददीन सय्यद, बबन नलावडे, पंढरीनाथ नलावडे,शुभम चव्हाण,दगु सोनवणे, मुख्याध्यापक हरिभाऊ दहीफळे, जैस्वाल सर, विश्वंभर नलावडे सह सोसायटी संचालक, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, कार्यकर्ती, शालेय विद्यार्थी नागरिक उपस्थित होते.

# दहावीच्या परीक्षेत धर्माबादची संजीवनी ९० टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण!

## तेलंगाना राज्याचा दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** तेलंगाना राज्याचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून त्या परीक्षेत बासर येथील रहिवाशी संजीवनी सायलू कुंटेलू हिने तब्बल 90% टक्के मार्क घेतले आहे संजीवनी सायलू कुंटेलू ही पत्रकार बाबुराव गोनारकर व प्रा. पी. डी. गोणारकर यांची भाची आहे.निर्मल बोर्ड हे आहे. शी. नागभूषण विद्यालय बासरमध्ये



ती शिक्षण घेत होती.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांने उपरोक्त यश मिळवल्यामुळे त्याच्या कौटुंबिक सदस्यासह धर्माबाद येथील मित्रपरिवारातही कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच शाळेतचे सर्व शिक्षक ज्या प्रमाणे मेहनत घेतली आहे. व माझ्या आईने माझ्यासाठी खूप संघर्ष केला आहे त्याच्या मुळे मी हे श्रीय माझ्या शाळेतल्या सर्व शिक्षकांना व माझ्या आईला तसेच प्रा.पी. डी. गोनारकर मामा यांना जाते.

# प्रशासनाला न जुमानता सोबलगाव धरण पाळुवरुन बिनदिक्कतपणे वाहतूक सुरुच

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील लघुपाटबंधारे धरणाच्या पाळूवरुन अद्यापही बिनदिक्कतपणे वाहतूक सुरुच असल्याचे चित्र आहे.

सोबलगाव लघुपाटबंधारे धरणात पाणी साठा सुकला सर्रास बिनदिक्कतपणे असल्याने शॉटकट रस्ता म्हणून पाळुच्या खालुन न जाता.पाळुच्यावरून भिंतीवरून वाहनधारक रस्ता वापरत आहे.यासंदर्भात दैनिकाने अनेक वेळा विभागाला बातम्या द्वारे अवगत केल्याने त्यांनी त्याची दखल घेत माहिती फलक लावून रस्ता प्रतिबंधित क्षेत्र घोषित करून बोर्ड लावून भिंतींवर आडवा मुरमाचा गंज टाकून अडथळा निर्माण केला परंतु वाहनधारक अद्याप ही विभागाला न जुमानता प्रतिबंधित क्षेत्र तथा मुरमाचा गंजा वरुन ओलांडून बिनदिक्कतपणे  वाहतूक सुरु आहे. यामुळे धरणांची पाळु दबत आहे. भविष्यात ही पाळू धोकादायक ठरू शकते .असा अंदाज अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.वरिष्ठानी याकडे लक्ष घालून हा प्रकार थांबवावा असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.

# धर्माबाद तालुक्यातील मजुरांचे रोजगारासाठी तेलगंणात स्थलांतर

## 250 ते 300 मजुरदार तेलगंणातील निझामाबाद येथे दररोज करतात अपडाऊन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबादेत काम मिळत नसुन, काम करण्यासाठी  मजुरदार तेलगंणा राज्यात जात आहेत. 250 ते 300 मजुरदार तेलगंणातील निझामाबाद येथे दररोज काम करण्यासाठी अपडाऊन करतात. आजही रोजगारासाठी महाराष्ट्र सिमेलगतचे गावे तेलगंणाच्या वाटेवर आहेत.

धर्माबाद तालुका हा महाराष्ट्र व तेलगंणा राज्य सिमेवर असुन  दोन्हीही राज्यांचा संबध येते. तालुक्यात सुशिक्षित बेरोजगार तरूणाची संख्या जास्त असून येथे काम तरी काय करावे ? तरूण पिढी आजही विचारात असतात, येथे काम मिळाले तर मजुरी कमी मिळते मग. तेलगंणात दुप्पट मजुरी मिळते मग तेलगंणात काम करण्यास काय हरकत आहे म्हणून काही मजुरदार तेलगंणातच भाड्याच्या खोलीत राहुन वर्षे, दोन वर्षे काम करतात. तर काही  250 ते 300 मजुरदार रेल्वेने दररोज अपडाऊन करतात. धर्माबादहुन निझामाबाद हे चाळीस कि.मी.असुन तेथे विविध रोजगार मिळतो. मिस्त्री, लेबर, हमाली, विविध दुकानात व काही




जॉब म्हणून ही कामे मिळतात. मजुरी दर, चांगल्या पद्धतीने मिळत असुन दररोजच्या दररोज काम केलेले पैसे मिळत असल्याने मजुरदार तेलगंणात जाण्यास आकर्षित होतात.सकाळी रेल्वेने जाणे व परत सायंकाळी रेल्वेने येणे मजुरदाराना सोयीस्कर तर पडतोच व कमी तिकीटात अपडाऊन होते. म्हणून रोजगार सुद्धा तेलगंणाच्या वाटेवर दिसुन येतो आहे. एक वर्षापासून एमआरजीचे बंद असुन तेही तुटपुंज्या मजूरी असल्याने मजुरदार पाठ फिरवली आहे. हैदराबाद,कामारेड्डी, निर्मल, म्हैसा, अदिलाबाद, आदि भागात विविध कंपनीत, शाळेत, महाविद्यालयात जॉब करणारे धर्माबादचे असुन तेथील शासनाच्या कामावर प्रभावित होऊन कायमचे राहण्याचा संकल्प घेतात तेथील शैक्षणिक दृष्ट्या चांगले असल्याने  मुला मुलीना शिक्षणासाठी तेलगंणात पाठवितात असे बरेच उदाहरणे, धर्माबाद मधुन दिसुन येते.

# हजारो महिलांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या प्रज्वल रेवन्नावर कडक कारवाई करा : प्रगती अहीर

## सेक्स स्कँडल आरोपी प्रज्वल रेवन्ना मोदीशहांच्या नाकाखालून परदेशी पळाला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचा कर्नाटकातील मित्रपक्ष जेडीएसचा उमेदवार प्रज्वल रेवन्ना याने हजारो महिलांवर लैंगिक अत्याचार केले. रेवन्नाने ब्लॅकमेल करुन महिलांवर अत्याचार केले व त्यांचे व्हिडिओही बनवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या नराधमासाठी मते मागितली तर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी याचा उल्लेख श्री. रेवन्ना असा केला. प्रज्वल रेवन्नाने केलेले गुन्हे अत्यंत गंभीर असून त्याच्या मुसक्या आवळून कडक कारवाई केली पाहिजे, अशी मागणी अखिल भारतीय काँग्रेस कमिटी मीडिया विभागाच्या महाराष्ट्र समन्वयक प्रगती अहिर यांनी केली आहे. टिळक भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना प्रगती अहिर म्हणाल्या की, प्रज्वल



रेवन्ना याच्या सेक्स स्कँडलची माहिती भारतीय जनता पक्षाला होती, असे असतानाही भाजपाने जेडीएसबरोबर कर्नाटकात युती केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रज्वल रेवन्नाचा प्रचारही केला. रेवन्नाला मत म्हणजे मोदीला मत असे मोदी म्हणाले. हजारो महिलांवर अत्याचार करणारा प्रज्वल्ल रेवन्ना मोदीशाह यांच्या नाकाखालून परदेशात पळला कसा. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वैयक्तीक कामासाठी किंवा उपचारासाठी परदेशात गेल्याची माहिती नरेंद्र मोदी व अमित शाह यांनी असते पण रेवन्ना पदेशात पळून गेला याची माहिती कशी मिळाली नाही.

कर्नाटकातील हजारो महिलांवर लैंगिक अत्याचार केले हा नारीशक्तीचा, मातृशक्तीचा अपमान नाही का. नारीशक्ती, मातृशक्ती या भाजपाच्या पोकळ घोषणा आहेत. मागील १० वर्षांच्या भाजपा राजवटीत देशभरात लाखो महिलांवर अत्याचार झाले, भाजपा खासदार ब्रिजभूषणसिंह याने महिला खेळाडूंवर अत्याचार केले पण त्याचावरही कारवाई केली नाही. मणिपूरमध्ये महिलांवर अत्याचार झाले त्यावर भाजपा व नरेंद्र मोदी काहीही बोलले नाहीत. भाजपा राजवटीत महिला सुरक्षित नाहीत, असेही प्रगती अहिर म्हणाल्या. या पत्रकार परिषदेला माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस इंडिया आघाडीचे उमेदवार भूषण पाटील, राकेश शेट्टी आदी उपस्थित होते.



# सुगंधी तंबाखू तस्कर ठक्करवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** सुगंधित तंबाखू विक्री प्रकरणी बल्लारपूरचा सुगंधित तंबाखू तस्कर जयसुख ठक्कर यांचेवर रामनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला असून सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केले आहे. या प्रकरणी एका तंबाखू विक्रेता ला अटक केले. २९ एप्रिल २०२४ रात्रौ दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन, रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत होते.

दरम्यान मुखबिरचे खबरे वरून आरोपी महेश ध्रुवप्रसाद गुप्ता रा.जी.एम. बंगल्या मागे, रयतवारी कॉलरी,चंद्रपुर याचे घराची तसेच त्यांने किरायाने घेतलेल्या खोलीची पंचा समक्ष झडती घेतली असता, सदर दोन्ही ठिकाणी ईगल हुक्का सुगंधीत तंबाकु, होला हुक्का सुगंधीत तंबाकु तसेच मजा १०८ सुगंधीत तंबाकु असा एकुण २ लाख १४ हजार २२०/- रूपयाचा माल जप्त करून नमुद आरोपी महेश ध्रुवप्रसाद गुप्ता रा.जी. एम.बंगल्या मागे, रयतवारी कॉलरी,चंद्रपुर यास जप्त सुगंधीत तंबाकु बाबत विचारणा केली असता त्यांनी जयसुख ठक्कर रा.बल्लारशाह जि.चंद्रपुर याचेकडुन आणल्याचे सांगितले. त्यावरून नमुद दोन्ही आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन रामनगर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीस पुढील तपास कामी पोलीस स्टेशन,रामनगरचे ताब्यात देण्यात आले.

सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन चंद्रपुर, अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधु यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश कोंडावार, यांचे नेतृत्वात सपोनि हर्षल ओकरे, पोउपनि विनोद भुरले, पोहवा /११७६ किशोर वैरागडे, पोहवा /२२९६ रजनिकांत पुठ्ठावार, पोहवा/५३२ सतिश अवथरे, स्थानिक गुन्हे शाखा,चंद्रपुर येथील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

# सेवा करण्याची संधी द्या; मतदारांना आवाहन

## विकास कामांना हरताळ : भौतिक सुविधांचे प्रश्न 'जैसे थे'

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात निवडणूका आल्या कि जातीपातीचं राजकारण केल जातं, कुणी भावनिक होतं तर कुणी जनता मायबाप असल्याचे बोलतात.पण सत्तेत असताना किंवा दिल्लीत जाऊन खुर्चीवर बसून एवढे वर्ष आणि यापुढे जनतेचा काय विकास करणार यावर एकही उमेदवार बोलायला तयार नसल्याने दिसुन येत आहे.सोयगाव व सावळदबारा परिसरातील सर्कलमध्ये तर भौतिक सुविधांचा अभाव असतांना त्यावर भाष्य करण्याचे सोडुन नवनिर्वाचीत उमेदवार हे मतदारांना कसे भावनिक करता येईल अन् आपली पोळी कशी भाजून घेता येईल याकडेच कल देत असल्याचे पाहण्यास चित्र मिळत आहे.निवडणूक आली की जनतेत जायचं आणि विकास करण्यासाठी व तुमची सेवा करण्याची संधी द्या म्हणत मतदाराला भावनिक केलं जात,निवडणूक ही विकासाच्या मुद्यावर व्हायला हवी,गेली अनेक वर्षापासून रस्ते, पाणी, वीज, उद्योग, तरूणाची बेरोजगारी हे प्रश्न सुटले नाहीत.जिल्ह्यातील हजारो तरूण परजिल्ह्यात कामाधंद्यासाठी जातात,तर उसतोड कामगारांच्या हातातील कोयता बंद होईना




कि उद्भवणारी पाणी टंचाई पाठ सोडेना यासह अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.निवडणूक काळात नेत्यांनी लोकहिताचे काय विकास कामे केली आणि यापुढे जर जनतेने कौल दिला तर काय विकास करणार याचा कसलाच अजेंडा उमेदवार मांडायला तयार होत नाहीत. एकमेकांवर आरोप, प्रत्यारोप करायचे आणि सभा गाजवायच्या भरकटलेल्या गप्पा मारून विकासाच्या मुद्याकठे दुर्लक्ष करायचे.यामुळे निवडणूका येतात आणि जातात पण विकास हा नावालाच राहतो कि काय असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.



# रापतवार नगरची पाईपलाईन तत्काळ दुरुस्ती करून स्वच्छ पाणी द्या : कैलासराव देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामदे**

**उमरी :** आज उमरी शहरातील रापतवार नगर येथे गेल्या काही दिवसापासुन पाईपलाईन फुटल्या कारनाने येणाऱ्या नळाला गडूळ घाण पाणी येत असल्याने रापतवार नगर च्या नागरिकांच्या आरोग्य धोक्यात येत असल्याने त्या रहीवाशी माता भगिनी नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयावर घाघर व बोबाबोम मोर्चा धडकला यावेळी या मोर्चाचे निवेदन युवानेते कैलासराव देशमुख गोरठेकर यांचे हस्ते नगरपालिका प्रशासनाला देण्यात आले व त्यांना सूचना करण्यात आले की तात्काळ स्वच्छ पाणी नागरिकांना द्यावे यावेळी उपस्थित गंगाधरराव सवई, संतोष नामेवार, गजानंन आडगुडवार, राजेश जाधव, त्रिरत्न सवई किशोर कवडीकर, सुशिलाबाई आडगुडवार, रेखा हानवते, पंचंफुलाबाई डुबुकवाड, शेख युनुस कुष्णा डुबुकवाड, शेषेराव हानमंते, सुभाष सवई, बालाजी गोणेकर, मानेजी डुबुकवाड, नागु सोनाई,धोडीबा सवई, लखन शिंदे, नरेंद्र नामेवार, शेख अहेमद,सावित्राबाई आडगुडवार, तुळसाबाई वाघमारे,रामदास हैबतकर,बाबु परतवाड, बालाजी बट्टेवाड, शेख शबीर यांच्या सह अनेक रहिवासी माता भगिनी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आता सामना दिवसाच्या उष्णतेशी व रात्रीच्या उकाड्याशी : हवामान शास्त्रज्ञ माणिक खुळे

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** अवकाळीचे वातावरण जवळपास निवळले



असून संपूर्ण महाराष्ट्रात वीजा, वारा, गारा व अवकाळी पावसासारख्या वातावरणा पासून सुटका मिळणार असल्याचे परंतु नागरिकांना दिवसाच्या उष्णतेशी व रात्रीच्या उकाड्याशी सामना करावा लागण्याची शक्यता सेवा निवृत्त जेष्ठ हवामान शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केली आहे.



खान्देश, नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अशा संपूर्ण १० जिल्ह्यात तसेच मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील सर्व नव्हे परंतु काही भागात, पहाटेचे किमान तापमान सरासरीपेक्षा ४ तर दुपारचे कमाल तापमान सरासरीपेक्षा २ डिग्री से. ग्रेड ने वाढल्यामुळे दिवसाची उष्णता बरोबर रात्रीच्या उकाड्यातही कमालीची वाढ होवून काहिली जाणवणार आहे. विशेषतः रात्री चा उकाडा अधिक जाणवेल असे ही खुळे यांनी सांगितले.

दक्षिण मध्य महाराष्ट्रातील पुणे,सातारा,सांगली, सोलापूर, कोल्हापूर ह्या पाच जिल्ह्यात ह्या उष्णतेचा परिणाम अधिक जाणवेल. येत्या मे महिन्यातील पहिल्या आठवड्यात ह्या दोन्हीही तापमानात मात्र हळूहळू वाढीचीच शक्यता असुन जन-जीवनाला ह्या असह्य उष्णता व उकाड्याशीच चांगलाच सामना करावा लागण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. विदर्भातील दोन्ही ही तापमान सध्या सरासरी इतकी असल्यामुळे तेथे सर्व सामान्य उष्णता जाणवेल.मुंबई शहर तसेच उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अश्या ७ जिल्ह्यात सध्या चालु असलेल्या उष्णतेच्या लाटेचा तसेच रात्रीच्या उकाड्याचा प्रभाव कायम असून तेथील जनजीवनाला येत्या मे महिन्यातील पहिल्या आठवड्यातही ह्या असह्य काहिलीचा सामना करावा लागण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. कशामुळे उष्णतेचे वातावरण टिकून असणार आहे - माणिकराव खुळे METEOROLOGIST (RETD.) IMD PUNE.

"महाराष्ट्राच्या पश्चिम किनार पट्टीवर अरबी समुद्रात हंगामी प्रत्यावर्ती वाऱ्यामुळे वायव्येकडून येणारी उष्णता व तयार झालेला हवेचा उच्चं दाब आणि त्यातून स्थिरावलेले वेगवान वारा (वहन) ह्यामुळे कोकणात उष्णतेची लाट सध्या टिकून आहे.मध्य महाराष्ट्रात तयार झालेल्या दक्षिणोत्तर वारा खंडितता प्रणालीतून तयार झालेला हवेच्या कमी दाबाचा द्रोणीय आस व त्यामुळे शांत वारा व वाढलेले पहाटेचे किमान तापमानामुळे रात्रीच्या उकाड्यात वाढ झालेली असल्याचे माणिकराव खुळे यांनी सांगितले आहे.

# राज्यघटना अबाधित ठेवण्यासाठी भाजपाला सत्तेतून तडीपार करा : डॉ. भालचंद्र मुणगेकर

## टिळक भवन येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभेची निवडणूक ही लोकशाही विरुद्ध हुकूमशाही अशी असून मोदी पुन्हा सत्तेत आले तर राज्यघटना बदलून देशात हुकूमशाही राजवट येईल. आरएसएसचा तर राज्यघटनेला पहिल्यापासूनच विरोध आहे. भाजपाचा ४०० पारचा नारा हा राज्यघटना बदलण्यासाठीच आहे, त्यामुळे घटना बदलणार नाही असे नरेंद्र मोदी कितीही सांगत असले तरी त्यांच्यावर विश्वास ठेवता येणार नाही. मोदी पुन्हा सत्तेत आले की राज्यघटना बदलणार त्यामुळे लोकशाही व राज्यघटना अबाधित ठेवण्यासाठी भाजपा व नरेंद्र मोदींना सत्तेतून तडीपार करा, असे आवाहन माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी केले आहे.

प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना डॉ. मुणगेकर यांनी उपस्थितांना व राज्यातील जनतेला महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा लोकशाही व राज्यघटनेवर विश्वास नाही. माजी सरसंघचालक गोलवलकर यांनी राज्यघटना ही गोधडी आहे असे म्हटले होते. भाजपा खासदार अनंतकुमार हेगडे यांनी ४०० जागांचे बहुमत मिळाले की राज्यघटना बदलणार हे जाहीरपणे सांगितले आहे. पंतप्रधान मोदींचे आर्थिक सल्लागार यांनीही नवीन राज्यघटना करणे गरजेचे असल्याचे म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आता प्रत्येक प्रचार सभेत राज्यघटना बदलणार नाही असे सांगत असले तरी त्यांच्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. काँग्रेसने राज्यघटना बदलली असा भाजपाकडून अपप्रचार केला जात आहे पण घटनेत दुरुस्ती करणे आणि घटना बदलणे याच फरक आहे. मोदी सरकारनेही निवडणूक आयुक्त नियुक्तीसंदर्भात नुकतीच



घटना दुरुस्ती केली आहे. लोकसभेसाठी दोन टप्प्यातील मतदान झाले असून भाजपाचा पराभव होत असल्याचे चित्र आहे, पराभवाच्या भितीने मोदी घाबरले असून आता ते, "मी फक्त निमित्त मात्र आहे, ईश्वरानेच मला पाठवले आहे" असे सांगत आहेत, याचा अर्थ मी देवाचा अवतार आहे, असे सांगून नरेंद्र मोदी जनतेची दिशाभूल करत आहेत असे मुणगेकर म्हणाले.

या कार्यक्रमाला प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस प्रमोद मोरे, राजन भोसले, राजेश शर्मा, जोजो थॉमस, गजानन देसाई, उत्तर मुंबईचे काँग्रेस उमेदवार भूषण पाटील आदी उपस्थित होते.

# रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या वतीने जागतिक कामगार दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. सुभाष शेटे**

**कवठे येमाई :** आज मे महिन्याचा पहिला दिवस अर्थात महाराष्ट्र दिन व कामगार दीन हा दिवस शिरूर तालुक्यातील रामलिंग येथे उत्साहात साजरा करण्यात आला. रामलिंग येथील ग्रामपंचायत मध्ये काम करणाऱ्या कामगार महिला, आपले काम प्रमाणिक करत असतात, या महिला नेहमी कष्ट करत असतात, त्यांच्या कामाचा गौरव व्हावा म्हणून रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या वतीने या कामगार महिलांना शाल, श्रीफळ, गुलाब फुल देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना या वेळी डसबिन भेट म्हणून देण्यात आले.

कोणतेही काम असो त्यात कमी पणा न मानता ते प्रमाणिक करायचे. तुम्ही जे स्वच्छ्ता ठेवण्याचे काम करता, हे काम खूप मोठे आहे, त्यामुळे याचा आपल्याला नेहमी अभिमान पाहिजे. कोणतेही अडचण असो,मी नेहमी तुमच्या सोबत आहे. तसेच उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दीन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा आहेत असे प्रतिपादन रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा अश्विनी (राणी) कर्डिले यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. या कार्यक्रमास गीता आढाव, रुपाली बोर्डे, ज्योती पारधी, आरती चव्हाण, गायत्री डींगरे, अमोल राठोड, सागर दांडगे, पूनम नेवसे, ज्ञानेश ब्राम्हणे, मयुरा दळवी अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्वांचे संस्थेच्या आभार वतीने मानण्यात आले.



# 'त्यांनी' कॉलर उडवून माझ्या विजयाचे दिले संकेत

## उदयनराजे भोसले : साताऱ्यातील गोडोली येथे कोपरा सभा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** महायुतीचे उमेदवार खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ साताऱ्यातील गोडोली येथे कोपरा सभा घेण्यात आली होती. यावेळी या सभेतून उदयनराजेंनी त्यांच्या कॉलर स्टाइल बाबत भाष्य केले. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी कॉलर उडविली होती. त्यामुळे या कॉलर बाबत चर्चा होताना उदयनराजेंच्या त्या कॉलरची सुध्दा बरीच चर्चा रंगली होती. या कॉलर बाबत उदयनराजे भोसले गोडोलीच्या कोपरा सभेतून बोलतांना म्हणाले की,महाविकास आघाडीच्या नेत्यांनी साताऱ्यात सभा घेऊन माझ्यासारखी कॉलर उडवण्याची स्टाईल केली.त्यांनी केलेले अनुकरण हे माझ्या विजयाचे संकेत आहेत. याचवेळी उदयनराजे भोसले यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर सुद्धा सडकून टीका केली. उदयनराजे म्हणाले की, महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील घोटाळा उघडकीस आला आहे. त्यामुळे महायुतीच्या शिष्टाचाराच्या पाठीशी राहायचं की भ्रष्टाचारी लोकांना मदत करायची, हे जनतेनेच ठरवावे. सिंचन खाते ताब्यात असताना विरोधी




उमेदवाराने जिल्ह्यासाठी एक पैसाही आणला नाही.त्यामुळे उमेदवाराला नैतिकदृष्ट्या मत मागायचा अधिकार राहिलेला नाही.त्यांचा नाकर्तेपणा लपवण्यासाठी विरोधक काहीही बरळत आहेत. त्यांच्या नेत्याला विदर्भ, कोकण, मराठवाडा, खानदेशात काहीच काम राहिले नसल्याने अडीच जिल्ह्यांचे नेतृत्व त्यांच्याकडे उरलेले आहे. त्यामुळेच माझ्या विरोधात त्यांनी जिल्ह्यामध्ये चार सभा लावल्या आहेत, असे सुद्धा त्यांनी म्हटले.उदयनराजे पुढे म्हणाले की, विरोधकांनी केवळ जातीजातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम केले आहे. याउलट केंद्र व राज्यातील महायुतीच्या सरकारने मोठा निधी देऊन जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण केले.जिल्ह्यातील गावागावात रस्ते पाणी योजना पोहोचवल्या.हीच निवडणुकीसाठी आपली जमेची बाजू असून लोकसभा निवडणूक झाल्यानंतर लगेच विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये महायुतीचे सहाही आमदार निवडून आणण्यासाठी मी कष्ट घेणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील आपण एकत्र काम करायचे असून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करायचे आहेत, असा विश्वास सुद्धा उदयनराजेंनी लोकांमध्ये निर्माण केला. ॲड. डी.जी. बनकर म्हणाले, भविष्याच्या प्रगतीसाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे मतांचा टक्का वाढवण्याची जबाबदारी सर्व कार्यकर्त्यांवर आहे. गोडोली सह शहराच्या हद्दवाढीमधील भागामध्ये कोट्यावधीची विकास कामे आपण हाती घेतली आहेत. या भागात राहणाऱ्या लोकांचे मतदान मोठ्या संख्येने व्हावे. यासाठी नियोजन करावे लागेल.

या सभेप्रसंगी आमदार श्री.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले, माजी नगरसेवक ॲड. डी.जी. बनकर, शेखर मोरे पाटील, विजय नाफड, ॲड. बाळासाहेब बाबर, शिरीष चिटणीस, सुनिता फरांदे, अविनाश कदम, अमोल मोहिते, जिल्हा परिषद संस्था फेडरेशनचे संचालक व्यंकटराव मोरे,माजी पंचायत समिती सदस्य आशुतोष चव्हाण, भाजप महिला व मोर्चाच्या प्रदेश कार्यकारणी सदस्या सुवर्णताई पाटील, अजिंक्यतारा सूतगिरणीचे चेअरमन उत्तमराव नावडकर, संभाजीनगरचे सरपंच सतीश माने राजू पिसाळ, सागर भोसले, सचिन तेरोडकर, फिरोज पठाण, माजी नगराध्यक्ष अशोक मोरे आदींसह कार्यकर्ते तसेच लोक उपस्थित होते.

# तुम्ही फोन घेतला नाही, माझ्या आईचा मृत्यू झाला : मिठू जाधव यांनी खा. डॉ. विखेंना सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** कोरोना संकट काळात माझी आई आजारी पडल्यानंतर उपचारासाठी मी तुमच्या कार्यकर्त्यांशी संपर्क केला, तुम्हालाही फोन केला. तुम्ही फोनच घेतला नाही. त्यामुळे उपचाराअभावी माझ्या आईचा मृत्यू झाल्याचे सांगत देउळगांव सिध्दी येथे झालेल्या सभेमध्ये स्थानिक नागरीक मिठू जाधव यांनी खा. डॉ. सुजय विखे यांना खडे बोल सुनावले. लोकसभा निवडणूकीतील भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ देउळगांवसिध्दी येथे जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजी कर्डीले यांच्या उपस्थितीत प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभा सुरू होऊन काही वक्त्यांची भाषणे झाल्यानंतर नागरीकांना बोलयचे आहे का अशी विचारणा करण्यात आल्यानंतर मिठू जाधव यांनी हातात माईक घेत आपली कैफियत मांडण्यास सुरूवात केली. जाधव म्हणाले, माझ्या आईला कोरोनाची लागण झाल्यानंतर तिच्यावर उपचार करण्यात आले. या आजारातून ती बरी झाल्यानंतर ती पुन्हा आजारी पडली. आईवर उपचार करण्यासाठी जाधव यांनी देउळगांवसिध्दी येथील विखे समर्थक कार्यकर्त्याशी संपर्क केला. त्या कार्यकर्त्याने आपली फारशी ओळख नाही. दुस-या कार्यकर्त्याशी संपर्क करण्याचा सल्ला दिला. जाधव यांनी दुसऱ्या कार्यकर्त्याशी संपर्क केला असता त्यानेही उडवाउडवीची उत्तरे दिली. माझा काही सबंध नाही, विळद घाटत गर्दी आहे असे सांगत दुसऱ्या कार्यकर्त्याकडूनही मदत मिळाली नाही.

मिठू जाधव यांनी खा. डॉ. सुजय विखे यांचा मोबाईल नंबर उपलब्ध करून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र खा. डॉ. विखे यांनीही जाधव यांच्या फोनला पतिसाद दिला नाही. त्यामुळे वेळीच उपचार न मिळाल्याने मिठू जाधव यांच्या आईचा मृत्यू झाला. अशी कैफियत जाधव हे मांडत असताना विखे समर्थक कार्यकर्त्यांनी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यावर मध्ये बोलू नका मला बोलू द्या. अशी मागणी जाधव यांनी केली, मात्र जाधव यांच्या हातातील माईक काढून घेण्यात येउन पुढील भाषणे सुरू करण्यात आली.



**जाधव यांच्या भाषणाचा व्हिडीओ व्हायरल :**
जाधव हे आपली कैफियत मांडत असताना अनेकांनी त्याचे व्हिडीओ चित्रण केले . ही बाब लक्षात आल्यानंतर शिवाजी कर्डीले यांच्या सुचनेनुसार ज्यांनी छायाचित्रण केले त्यांच्या मोबाईलमधील छायाचित्रण सक्तीने डिलीट करण्यात आले . मात्र काही हुषार कार्यकर्त्यांनी डिलीट केलेला हा व्हिडीओ रीसायकलबीन मधून पुन्हा रिस्टोअर केला आणि तो व्हिडीओ संपूर्ण जिल्हयात व्हायरल झाला .

**विखे यांना रोषाला सामोरे जावे लागतेय :**
गेल्या पाच वर्षात मतदारसंघातील अनेक गावांशी संपर्क न ठेवल्यामुळे, विकास कामांची दिलेली अश्वासने पुर्ण न केल्याने विखे यांना अनेकदा नागरीकांच्या रोषाला समोरे जावे लागत आहे . देऊळगाव सिद्धी येथील मिठू जाधव यांच्या आईला उपचार न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याने कोरोना काळात विखे यांनी लोकांना मदत केल्याचा त्यांच्या कार्यकर्त्यांकडून केल्या जात असलेल्या दाव्याचा फोलपणा उघड झाला आहे .

# जहाल नक्षल नेता जोगन्ना अबुझमाडच्या चकमकीत ठार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जिल्ह्यात नक्षलवादी चळवळीच्या उदयापासून प्रत्येक घडामोडीचा साक्षीदार असलेला नक्षल नेता जोगन्ना ३० एप्रिल रोजी छत्तीसगडमधील अबुझमाडच्या जंगलात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत ठार झाला. या चकमकीत एकूण दहा नक्षलवाद्याना कंठस्नान घालण्यात पोलिसांना यश आले असून त्यापैकी दोघांची ओळख पटली आहे. त्यात विभागीय समिती सदस्य जोगन्ना उर्फ नरसय्या आणि विनय उर्फ अशोक यांचा समावेश आहे.

१९८० च्या काळात तेव्हाच्या आंध्रप्रदेशातून गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादी चळवळीचा शिरकाव झाला. त्यात बरेच उच्च शिक्षण घेतलेल्या तरुण, तरुणीचादेखील सहभाग होता. या रांगेत तेलंगणातील बेलमपल्ली येथील रहिवासी असलेला जोगन्ना देखील होता. शिक्षण कमी असल्याने जोगन्ना चळवळीत मोठ्या पदावर गेला नाही. परंतु प्रत्येक योजनेत त्याचा सहभाग असायचा. जहाल नक्षलवादी नर्मदा, शंकर, तारक्का यांच्यासह चळवळीतील वरिष्ठ नेत्यांसोबत मिळून त्याने गडचिरोलीत चळवळीचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला. दक्षिण



आणि उत्तर गडचिरोलीत त्याचा वावर होता. मधल्या काळात पोलिसांच्या कारवाईत अनेक मोठे नक्षल नेते ठार झाले. त्यामुळे तो भूमिगत होऊन अबुझमाडमध्ये वास्तव्यास होता. वयाची सत्तरी पार केलेला जोगन्नाला शेवटच्या काळात एटापल्ली, धानोरा आणि अहेरी तालुक्यात पहिल्या गेले. पण तो पोलिसांच्या हाती लागला नाही. गडचिरोलीत त्याच्यावर शंभरहून अधिक गुन्हे दाखल असून २० लाखांपेक्षा अधिक बक्षीस होते. त्याच्या मृत्यूने नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा बसला आहे. त्याच्यासोबत ठार झालेला विनय हा नक्षल्यांचे आर्थिक नियोजन सांभाळायचा.

'त्या' अपहरणात प्रमुख भूमिका २०१० साली आर.आर.पाटील गडचिरोलीचे पालकमंत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी श्रीनिवास गोडसेलवार यांचे नक्षल्यानी अपहरण केले होते. यात जोगन्नाने प्रमुख भूमिका निभावली होती. गोडसेलवार यांना नक्षल्यांनी नऊ दिवस ओलीस ठेवले होते. त्यावेळेस पोलिसांनी गोडसेलवार यांच्या सुटकेसाठी थेट कोरनारच्या जंगलात नक्षल्यांच्या 'कॅम्प'वर धावा बोलला होता. यावेळी मोठी चकमक उडाली होती. त्यातून केंद्रीय समिती सदस्य भूपती आणि जोगन्ना थोडक्यात बचावले होते.



## वडोद बाजार येथे ड्रेनेजचे काम निकृष्ट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील वार्ड क्रमांक एक मध्ये ड्रेनेज लाईन चे काम सुरू असून ते ते काम निष्कृष्ट दर्जाचे होत असून ट्रेनिंग लाईनचे चेंबर बनवलेले आहे त्यावर कुठलेही पाणी न मारता तात्काळ जेसीबीच्या साह्याने बुजून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे व पाणी न मारता चेंबर झाकून टाकत आहे तर वरिष्ठ अधिकारी इंजिनिअर यांना ठेकेदाराकडून टक्केवारी ठरलेली असल्यामुळे कुठलेही कामात सुरू असल्यास ते ठेकेदाराच्या मनमानी पद्धतीने सुरू राहते थातूरमातूर करून ठेकेदार मोकळे होतात वरिष्ठ अधिकाऱ्यांचे टक्केवारी घेतात की काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे. वडोद बाजार येथील अनेक कामं त्याच ठेकेदाराला देण्यात येता त्यामुळे ठेकेदार दिलेले काम धातुर्मातुर करून एमबी बनून बिल काढून मोकळे होतात तर वडोद बाजार येथील ट्रेनिंग लाईनचे काम सुरू असून हे कामाचे बिल काढण्यात येऊ नाही तर हे काम चांगल्या दर्जेदार प्रमाणे करण्यात यावे, अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, जवळपास हे काम पाच लाखापर्यंत इस्टिमेट आहे ग्रामसेवक यांना इस्टिमेट मागितल्यास उडवडीचे उत्तर देतात कारण की ग्रामसेवक यांना ठेकेदाराला पाठीशी घालण्याचे काम सुरू आहे तर ठेकेदार शासनाचे ट्रेनिंग लाईनसाठी पाच लाख रुपये आलेले थातूरमातूर काम करून शासनाच्या पाच लाखाचा डल्ला मारत आहे. त्याचेही टक्केवारी ठरलेली राहती तरी आहे की काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकात होत आहे वरिष्ठ अधिकारी यांनी काळजीपूर्वक दखल घेऊन ट्रेनिंगळे यांचे काम सुरू असल्यास ते चांगल्या पद्धतीने करून घेण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## महाराष्ट्रातील कामगार दिनानिमित्त सुलताने पाटील प्रतिष्ठान यांच्या वतीने ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** १ मे - रोजी महाराष्ट्र दिन,कामगार दिनानिमित्त सुलताने पाटील प्रतिष्ठान छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने वेरूळ आयुष्यमान आरोग्य मंदिर येथे ध्वजारोहण करण्यात आले. त्याप्रसंगी वेरूळ आयुष्मान आरोग्य मंदिर चे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजुळे साहेब, सुलताने पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ.भागवत सुलताने पाटील, समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सहाय्यक, परिचारिका,102 वाहन चालक, 108 आपत्कालीन वैद्यकीय अधिकारी, गटप्रवर्तिका, सर्व आशा सेविका व सुलताने पाटील प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सभासद हजर होते.



## भिवंडी लोकसभा निवडणूक रणधुमाळीत भाजपाचे एक मांडव पंगती दोन?

### पक्षातीलच बे भरवशांच्या बैठकीकडे उमेदवार गटाची पाठ

आधुनिक केसरी न्यूज

'तालुकाअध्यक्ष असूनही मलाच या बैठकीचे निमंत्रण मिळाले नसल्याने मी उपस्थित राहु शकलो नाही . ( **जयवंत सुर्यराव,तालुकाध्यक्ष भाजपा .**)
विशेष म्हणजे मला देखील या कार्यक्रमाची कोणतीच कल्पना नाही .
( **भाजपा जिल्हाध्यक्ष,मधुकर मोहपे .** )
मला आमंत्रण असेल परंतु मी आजारी असल्याने गेले नाही .
( **शितल तोंडलीकर महिला जिल्हाध्यक्षा ग्रामिण** )

**महेश तारमळे**

**ठाणे :** भिवंडी लोकसभेचे उमेदवार कपिल पाटील यांचे प्रचारार्थ स्थानिक आमदार कथोरे यांचे मुरबाड मधिल निवास स्थानी सोमवारी आयोजित केलेल्या कार्यकर्ता बैठकीत सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण,भाजपचे संघटन मंत्री,यांचेसह अनेक पदाधिकारी उपस्थिती असताना भाजपचे जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष व उमेदवार यांनी स्वताला सम्राट समजणा-यांना दाखवून दिले की आम्ही देखील स्वलंबी आहोत,तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी पाठ फिरवल्याने आमदार आणि कपिल पाटील यांचे मधिल मत "भेद" ऐन निवडणूकीत चव्हाट्यावर आले असून याचा फायदा महाविकास आघाडीला मिळणार यांत शंकाच नाही.

त्याप्रसंगी रविंद्र चव्हाण यांनी येणाऱ्या निवडणुकीत मिळणाऱ्या विजयाचे आपण भागीदार झाले पाहिजे महाराष्ट्रात मुरबाड मतदार संघ हा उमेदवाराला लिड देणारा मतदार संघ म्हणुन मुरबाड ची ओळख आहे.तोच लिड लोकसभेच्या निवडणुकीत आपण द्याल असे आवाहन केले.

तर आमदार किसन कथोरे नी कपिल पाटला साठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात चांगलीच आगपाखड करताना जुन्या जखमांना ओलावा देत भारतीय जनता पार्टीने मुरबाड मधिल एकनिष्ठ कार्यकर्त्यांना नेहमीच सवतीच्या मुलाची वागणुक दिली आहे. पक्षाचा सदस्य नसलेल्या कार्यकर्त्यांला जिल्हाध्यक्ष पदावर बसवले,याचे पेक्षा कोणतेच दुर्दैव नाही. कपिल पाटील यांचे नाव न घेता कथोरे म्हणाले की ज्याचे लग्न आहे.त्याने पत्रिका नाही पण सुपारी देऊन तरी पाचारण केले पाहिजे.प्रचारा बाबत एकही कार्यकर्त्याला यांची कल्पना नाही.





## ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे 01 मे 2024 वार बुधवार रोजी ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल या ठिकाणी विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक श्री शरद निकम यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री योगेश झिंजुर्के सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी इयत्ता अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात येऊन गुणपत्रक वाटप करण्यात आले. सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## १८२ गावांत पाणी पेटले! ग्रामस्थांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्ह्यात पाणीटंचाईच्या झळा तीव्र झाल्या आहे. यामुळे शेकडो गावांतील लाखो ग्रामस्थांचे पाण्यासाठी हाल होत आहे. जिल्ह्यातील ४६ गावांवर टंचाईचे सावट पसरले आहे. जलस्रोत कोरडे पडल्याने व पर्यायी योजना नसल्याने टँकरशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. सध्या ५ तालुक्यातील ४६ गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. यामध्ये देऊळगाव राजा



तालुक्यातील ११, चिखली मधील १०, बुलढाण्यातील १२, मेहकरमधील ९ तर मोताळा तालुक्यातील ४ गावांचा समावेश आहे. या ४६ गावांची लोकसंख्या १ लाख ४४ हजार ६४० इतकी आहे. खासगी अधिग्रहित विहिरींद्वारे तहान भागविल्या जाणाऱ्या गावांची संख्या १३६ इतकी आहे. यासाठी १६८ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहे. सुमारे एक लाख लोकवस्तीच्या या गावातील रहिवाशांचे टंचाईमुळे बेहाल होत आहे. लोकसभा लढून दमलेले सर्वपक्षीय नेते आता विश्रांती घेत आहे. त्यात आचारसंहिताचे कारण आहे. यंत्रणा निवडणुकीनंतरच्या व अन्य कामात व्यस्त आहे. यामुळे जनतेला कोणी वालीच उरला नसल्याचे भीषण चित्र आहे.

## पावसाचा तडाखा, २०४ वीज खांब कोसळले

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात प्रचंड वादळासह झालेल्या पावसामुळे वीज यंत्रणा विस्कळीत झाली. पहाटे तीन वाजताच्या सुमारास खंडीत झालेला सहा उपकेंद्राचा आणि त्यावर अवलंबून असलेल्या २४३ गावाचा वीज पुरवठा महावितरण कर्मचाऱ्यांच्या अविरत प्रयत्नामुळे १० तासानंतर पूर्ववत करण्यात आला. वादळामुळे महावितरणच्या झालेल्या नुकसानाचे स्वरूप बघता विस्कळीत झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरूस्ती कार्याला अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि यवतमाळ जिल्ह्याचे प्रभारी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात गती देण्यात येत आहे. पहाटे तीनच्या दरम्यान झालेल्या चक्रीवादळासह पावसामुळे जिल्ह्यातील महावितरणच्या यवतमाळ विभागातील ३३ केव्ही वडगाव, ३३ केव्ही झाडगाव, ३३ केव्ही कोठा, पुसद विभागाअंतर्गत ३३ केव्ही निंभी भोजला, ३३ केव्ही चोंढी आणि पांढरकवडा विभागातील ३३ केव्ही मुरली सायखेडा या सहा उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही वीज वाहिनीवर तसेच या उपकेंद्रातून वीज पुरवठा करणाऱ्या लघुदाब वाहिनीवर झाडे उन्मळून पडल्याने २०४ विद्युत खांब तुटून पडले. काही ठिकाणी आकाशातील विजेमुळे चुंबकीय क्षेत्र निर्माण होऊन इन्सुलेटर फुटल्यामुळे या उपकेंद्राचा वीज पुरवठा बंद पडला होता. परिणामी या सहा उपकेंद्रातून निघणारे ४६ फिडर बंद पडल्याने २४३ गावांना वीज पुरवठा करणारे २ हजार २११ रोहित्रे बंद पडली होती.

# शेतकऱ्यांना उन्नतीकडे घेऊन जाण्याचे काम मोदींनी केले

## सुनील तटकरे : पेण विधानसभा मतदारसंघातील नांदगाव येथे महायुतीची जाहीर सभा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदगाव :** माझ्या काबाडकष्ट करणाऱ्या लोकांच्या घराघरात नळाद्वारे पाणी गेले पाहिजे असा विचार करणारे... शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आले पाहिजे... सुगीचे दिवस आले पाहिजे यासाठी थेट पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आणि त्यांना उन्नतीकडे घेऊन जाण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्याचे उद्गार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांनी नांदगाव येथे काढले.
या रायगड लोकसभा मतदारसंघात माझा संपर्क गेल्या ४० वर्षाचा आहे...अनंत गीते यांच्यासारखा एका दिवसाचा नाही असा टोला लगावतानाच लोकांच्या भावनांची जाणीव नसलेले अनंत गीते निवडणूक लढवत असल्याचे सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.
आजच्या नांदगावमधील सभेला जमलेला जनसमुदाय बघून अलिबागच्या जयंत पाटील यांचा एकेकाळी असलेला प्रभाव आता राहिला नाही हे सिध्द होत आहे अशी टिप्पणीही सुनिल तटकरे यांनी केली.
या निवडणुकीत जातपात बघून निवडणूक होत नाही. या देशाची काळजी करतो तो पंतप्रधान झाला पाहिजे. यादृष्टीने निवडणुक होत असते असे सांगतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी सुनिल तटकरे यांना लोकसभेत पाठवण्याचे आवाहन माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी केले. पेण विधानसभा मतदारसंघात सुधागड तालुक्यातील नांदगाव येथे महायुतीची जाहीर प्रचार सभा पार पडली.
या जाहीर सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, शिवसेना संपर्क प्रमुख प्रकाश देसाई, सुधाकर घारे आदींसह महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, मनसे, आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.





# कोणी, काहीही सांगो या वाई मतदारसंघामध्ये सर्वात जास्त लीड मिळेल : शशिकांत शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** सातारा लोकसभा निवडणूक प्रचारार्थ वाई येथे देशाचे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी माजी मुख्यमंत्री सातारा जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे प्रमुख पृथ्वीराज चव्हाण, श्रीनिवास पाटील, बाळासाहेब पाटील, भारत पाटणकर, दीपक पवार, नितीन सावंत, शब्बीर शेख,सारंग पाटील, सचिन मोहिते, संदीप देसाई, वर्षाताई देशपांडे, संजयराव जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.
कोणी काहीही सांगू या वाई मतदारसंघामध्ये सर्वात जास्त लीड महाविकास आघाडीला मिळेल. असा विश्वास सातारा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केला.
शशिकांत शिंदे म्हणाले की,आजची ही सभा ऐतिहासिक सभा आहे.असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.साहेब आपले धन्यवाद मानेन आपण मला उमेदवारी जाहीर केली.मला दिल्लीला जायचं नव्हतं पण आपण जबाबदारी दिली.लोकांचे प्रेम,तुमच्याबद्दलची आपुलकी काय आहे.हे सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना समजते.ज्यावेळी उमेदवार म्हणून मी जाहीर झालो, अगदी महाबळेश्वर मध्ये १५ वर्षांपूर्वी काम करणारा शशिकांत शिंदे असेल खंडाळ्यापर्यंत आणि वाईच्या कोपऱ्यापर्यंत काम करणारा शशिकांत शिंदे असेल मी माझे सगळे सवंगडी घेऊन गावांमध्ये गेलो.पूर्वीच्या महाबळेश्वरच्या असलेल्या खोऱ्यातले प्रेम मला आजपर्यंत तसेच पाहायला मिळाले.तेच प्रेम खंडाळा तालुक्यामध्ये सुद्धा... खरं म्हटलं तर सर्व सर्वसामान्य कार्यकर्त्यांची ऊर्जा काय असते इतक्या उस्फुर्तपणे लोकांनी प्रतिसाद दिला आहे.अगदी काल-परवापर्यंत छप्पन गावांचा सुरू असलेला दौरा याचा उल्लेख करावा लागेल.तसेच मी प्रामाणिकपणे सांगतो,अनेक जण म्हणतात वाई मतदारसंघ उद्याचा खासदार ठरवणार आहे.आज सांगतो,कोणी काहीही सांगू या वाई मतदारसंघामध्ये सर्वात जास्त लीड महाविकास आघाडीला मिळेल.अशी मला खात्री आहे.
पुढे शशिकांत शिंदे म्हणाले की,खंडाळ्यामध्ये माथाडी कामगार फार मोठ्या प्रमाणात आहे.वाईत आहेत.आजच्या या सभेच्या निमित्ताने आपण इतक्या मोठ्या प्रमाणात आलात.अगदी ह्दयापासून तुमचे आभार व्यक्त करतो.गावा गावामध्ये जाताना लोक म्हणत होते, मी माझ्या नेत्यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरविणार आहे.सर्वसामान्यांच्या असलेल्या खंडाळ्यातील लोकांच्या प्रश्नांपासून ते पुनर्वसन आणि पाणी प्रश्नापर्यंत सोडवण्यासाठी प्रयत्नशील असेल.
दोन-तीन दिवस झाले काही लोक चव्हाण साहेबांवर फार बोलत आहे, ज्याला त्याला चव्हाण साहेबांची आठवण येत आहे.चव्हाण साहेबांचा विचार पवार साहेबांनी पहिल्यापासून मानसपुत्र म्हणून जपला.जे कधी चव्हाण साहेबांच्या समाधीस्थळावर गेले नाही, ज्यांनी कधी चव्हाण साहेबांचा विचार जपला नाही, ते यावर बोलत आहेत. आज कराडला सभा होत असेल, मला माहित नाही चव्हाण साहेबांच्या समाधीवर जातील का नाही ? कदाचित चव्हाण साहेबांच्या समाधी स्थळावर नमन केल्याशिवाय निवडणूक जिंकणार नाही म्हणून जातील पण. चव्हाण साहेब यांचे आशीर्वाद असतील ते त्यांचे विचार जपणाऱ्याला... निवडणुकीचे राजकारण लोकशाहीने व्हावं लागतं. हल्ली मतदान होतं का नाही अशी शंका आहे. निवडणूक सुरू झाली, सुडाच राजकारण सुरू होतं. महाराष्ट्रातील अनेक दिग्गज कार्यकर्त्यांना चांगल्या कार्यकर्त्यांना जे पवार साहेबांच्या पाठीमागे राहिले, जे काँग्रेसच्या विचाराच्या पाठीमागे राहिले, जे शिवसेनेचा विचाराच्या पाठीमागे राहिले, अशा सर्व मंडळींना कालपर्यंत त्रास देण्याचा प्रयत्न होतो. ही मंडळी हलल्याशिवाय आपण महाराष्ट्र जिंकू शकत नाही, त्यामुळे अशा प्रकारचा प्रयत्न सोलापूर पासून साताऱ्यात केला जातो.असे सुध्दा त्यांनी सांगितले.
शशिकांत शिंदे यांनी पुढे सांगितले की,वाईच्या लोकांनी मतदानाला जाताना कोणी काय करायचे करून द्या,परंतु समोर असलेल्या सर्वांना विनंती आहे,सात तारखेपर्यंत एवढे काम करा; कारण अंडर करंट इतका आहे त्याला ठेवून द्या,त्याचा स्फोट होऊ द्या, त्याच्या शॉक मध्ये महायुती कोसळून जाईल .खंडाळ्यामध्ये औद्योगिक क्षेत्र वाढले.आमच्या लोकांच्या मागण्या आहेत.आयटी पार्क साहेबांनी एक शब्द टाकला की साताऱ्यामध्ये, इंडस्ट्रियल एरिया यासाठी माझे सर्व विनंती आहे माझा हा नेता आम्ही सर्वजण मंडळी यासाठी लढत आहोत. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी, देशाच्या लोकशाहीसाठी या सर्व गोष्टीचा विचार करून सात दिवस असं काम करा,अशा पद्धतीने काम करा इतिहास घडवा... तो इतिहास असा घडवा आजही चव्हाण साहेबांचा जिल्हा, शरद पवार साहेबांचा जिल्हा, असंख्य महान व्यक्तींचा तोच जिल्हा सर्वाधिक ऐतिहासिक मताने हा खासदार निवडून देण्याचा इतिहास करूया, हा शब्द साहेबांना देऊया.असे आवाहन सुद्धा शशिकांत शिंदे यांनी केले.

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी निवासी समर कॅम्प २०२४ मध्ये सहभागी व्हा

## ग्रा. पं. सदस्या वैशाली रत्नपारखी यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज




**कवठे येमाई :** राजमाता प्रतिष्ठाणच्या वतीने शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे विद्यार्थांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी दि. ६ मे ते ९ मे दरम्यान येथील बालाजी मंगल कार्यालयात निवासी समर कॅम्प २०२४ चे आयोजन करण्यात आले असून यात अधिकाधिक विध्यार्थ्यांनी मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन कवठे येमाईच्या ग्रा. पं. सदस्या वैशाली रत्नपारखी यांनी केले आहे.
इयत्ता पहिली ते ९ वी पर्यंतचे विद्यार्थी या उपक्रमात सहभाग नोंदवू शकणार असून या चार दिवशीय उपक्रमात डायरी लेखन,सप्तसुरांची ओळख,विद्यार्थांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी या वर्षी सुट्टीचा सद्‌उपयोग, दिवसीय ट्रिप, कॅम्प फायर, हस्ताक्षर सुलेखन,लाठी काठी प्रशिक्षण, एकपात्री नाट्य प्रशिक्षण,किड्स गेम,अवकाश निरीक्षण, विज्ञान प्रयोगाची ओळख,जादूचे प्रयोग,चित्रकला, एरोबिक डान्स,योगा, संस्कार वर्ग, स्वयंशिस्त,ध्यानधारणा इत्यादी उपक्रम विद्यार्थ्याच्या कला गुणांना वाव मिळावा या हेतूने हा विद्यार्थांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी निवासी समर कॅम्प आयोजित केला असून या चार दिवासीय निवासी समर कॅम्पसाठी नाममात्र प्रवेश फि १६९९/- ठेवण्यात आली असून यात कॅम्पमध्ये सहभागी विद्यार्थी यांना निवास, नास्ता, जेवण इत्यादी आवश्यक सुविधा देखील पुरविण्यात येणार असून शेवटच्या दिवशी विविध वॉटर कलर, लँडस्केप पेंटींग प्रदर्शन व आई-वडिलांशी मुलांचा अधिक स्नेह व आपुलकीचे नाते अधिकाधिक निर्माण व्हावे या हेतूने त्यांनाही निमंत्रित करून त्यांचे पूजन करण्यात येणार असल्याचे रत्नपारखी यांनी सांगितले.
हा शिबीर कालावधी - ६ मे ते ९ मे दरम्यान असून वयोगट १ ली ते ९ वी असणार आहे.शिबिरात देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात आकलन क्षमता कशी वाढवावी, धडे भाषण कलेचे, अध्यात्म आणि विज्ञान, आत्मविश्वास कसा वाढवावा, आई वडीलाप्रती आदर निर्माण करणे, संस्कारक्षम विद्यार्थी घडविणे इत्यादी संस्कारक्षम उपक्रम या कॅंप कालावधीत राबविण्यात येणार असून शिबिर स्थळः बालाजी मंगल कार्यालय, कवठे येमाई, शिरूर हे असून ज्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी 9561928199, 7840940579 या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन राजमाता प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# दीड वर्षापूर्वीच्या हल्ल्याचा घेतला बदला

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** दीड वर्षापूर्वीच्या वादाचा बदला म्हणून शेजारी राहणाऱ्या युवकाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला. ही घटना आज, मंगळवारी दुपारी शहरानजीक लोहारा येथे घडली. जय विजय पाटील ( २६ ) रा. पंचशीलनगर लोहारा असे मृताचे नाव आहे. त्याचा शेजारी राहणाऱ्या दिगांबर उर्फ दीक्षित हिरणवाडे याच्याशी वाद होता दोघांमध्ये नेहमीच खटके उडत होते. दोन वर्षापूर्वी शुभेच्छा फलक फाडल्यावरून प्रकरण विकोपाला गेले होते. त्यावेळी जय पाटील याने चाकू हल्ला करून दिगांबर हिरणवाडे याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. शस्त्रक्रियेनंतर त्याचा जीव वाचला.

# थापा मारणाऱ्यांना जनताच घरचा रस्ता दाखवणार

## सोमठाणा येथील प्रचार सभेत डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** विकासाच्या नावाखाली केंद्रातील भाजपा सरकारने मागील दहा वर्षात केवळ थापा मारण्याचे काम केले आहे. महागाई, बेरोजगारी वाढली असून मालाला योग्य भाव मिळत नसल्याने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसह सर्व सामान्य जनता या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता दाखवणार असल्याचा विश्वास जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास(इंडिया)आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांनी आज सोमवारी येथे बोलतांना व्यक्त केला.

जालना लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ आज सोमवारी बदनापूर तालुक्यातील रोषणगाव, बाजार गेवराई बाजार,शेलगाव जिल्हा परिषद गट व बदनापूर शहराची प्रचार सभा सोमठाना येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

याप्रसंगी जालना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट)जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख,मा.आ.संतोष सांबरे, राजेंद्र राख, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी,जयप्रकाश चव्हाण, बाबूराव पवार, भानुदासराव घुगे, बाबासाहेब डांगे, दीपक डोंगरे, भास्कर मगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना डॉ.कल्याण काळे म्हणाले की, केंद्रातील भाजपा सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महाराष्ट्रासह देशातील शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव देण्याचे आश्वासन दहा वर्ष सत्ता असतांना पाळले नाही.अत्यंत कमी भाव मिळत असल्याने मागील दोन वर्षापासून आपला कापूस आणि सोयाबीन शेतकऱ्यांनी घरात ठेवले आहे. भांडवलदार आणि उद्योगपतींचे लाड पुरविणाऱ्या या सरकारने कामगार विरोधी कायदे अमलात आणून देशातील लाखो कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपाशी मारण्याचे काम केले असून नौकऱ्या, कामधंदे नसल्याने लाखो सुशिक्षित तरुण बेरोजगारीचा सामना करत असल्याचे आपण नेहमीच बघतो आहोत.महागाईने कळस गाठला असल्याने सर्वसामान्य जनता घरगाडा सांभाळताना अक्षरशः वैतागून गेल्याचे चित्र मन सुन्न करणारे असून केंद्रातील भाजपा सरकारच्या विरोधात देशात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गावागावात प्रत्येक घरापर्यंत पोहचवून केंद्रातील भाजपा सरकारला खाली खेचण्यासाठी मतदारांशी संपर्क साधून महाविकास आघाडीच्या विजयासाठी प्रयत्न करावा असे आवाहन उमेदवार डॉ.कल्याण काळे यांनी केले आहे. तत्पूर्वी राजाभाऊ देशमुख, भास्करराव अंबेकर, डॉ. निसार देशमुख, माजी आ.संतोष सांबरे, बबलू चौधरी आदी मान्यवरांनी



आपल्या भाषणातून केंद्र आणि राज्यातील सरकारच्या कारभारावर टीका करून महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांना मोठया मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. सभेपूर्वी उमेदवार डॉ.कल्याण काळे आणि अन्य मान्यवरांनी बदनापूर तालुक्याचं दैवत सोमठाणा येथील माता रेणुका देवीची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले. देवीच्या दर्शनाने मन प्रफुल्लित होऊन पुढील कार्यास ऊर्जा मिळाली अशी प्रतिक्रिया डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास ठोंबरे, राम शिरसाठ, रमेश शिंदे, कैलास चव्हाण, विजय जऱ्हाड, भगवान कदम, लक्ष्मण म्हसलेकर, बाबासाहेब डांगे, अंकुश शिंदे, चितळकर, राजेंद्र जैस्वाल, शेळके, श्रीराम कान्हेरे, राजेंद्र शिनगारे, देहूजी जऱ्हाड, रामकीसन मेंढरे, अरुण पैठणे, शिवाजी कऱ्हाड, संभाजी शेळके, परमेश्वर गोते, भारत मदन, भास्कर शिंदे, पद्माकर पडुळ, संतोष नागे यांच्यासह बदनापूर शहर आणि रोषणगाव, बाजार गेवराई, सेलगाव आणि परिसरातील शेतकरी, कामगार, ग्रामस्थ पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# गोरगरिबांना अच्छे दिनचे स्वप्न दाखवणाऱ्यांना धडा शिकवा : खैरे

## कन्नड तालुक्यातील पिशोर, चिंचोली, करंजखेड, नागद येथे प्रचार सभा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** २०१४ मध्ये सोशल मीडिया आणि जाहिराबाजी करून सत्ता मिळवली. गोरगरिबांना अच्छे दिनचे स्वप्न दाखवनाऱ्यांना धडा शिकवा, असे अवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी केले. नोटबंदी, जीएसटी, इलेक्ट्रॉल बॉण्डच्या पैशावर निवडणूक लढणाऱ्याना जागा दाखवा असे खैरे म्हणाले. कन्नड तालुक्यातील पिशोर, चिंचोली, करंजखेड, नागद येथे प्रचार सभा प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी शिवसेना नेते, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले की, देशात नोटबंदीचा फटका उद्योजक यांना नव्हे तर शेतकरी कष्टकरी गोरगरिबांनी सोसला. भाजपाला गोरगरिबांचे काही देणे घेणे नाही. त्यांना चिंता आहे ती उदयोजकांच्या पैशांची. महाविकास आघाडी हा जनसामान्यांच्या बुलंद आवाज आहे जो सत्तेची पर्वा न करता गोरगरिबांच्या अन्याया विरुद्ध आवाज उठवून न्याय मिळवून देण्याचे अहोरात्र काम करते. प्रत्येक शिवसैनिक आपल्या सुख दुःखात हजर आहे यापुढेही प्रत्येक शिवसैनिक आपल्या सेवेत कुठल्याही लाभाची परवा न करता हजर राहील हि आम्हाला शिवसैनिकांची शिकवण आहे. पण अच्छे दिन चे स्वप्न दाखवणाऱ्यांनी दुष्काळात तोंड दाखवले नाही. कोरोनात भाजप ने काय केले नाही. देशात महागाई वाढवली, बेरोजगारी वाढवली, अराजकता वाढवली, म्हणून यांना घरी बसवणे गरजेचे झाले आहे असे दानवे म्हणाले.

यावेळी महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार माजी खासदार चंद्रकांत खैरे, विधानपरिषद विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, आमदार उद्यसिंग राजपुत, माजी आमदार नामदेव पवार, जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड , आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख बाबासाहेब मोहिते पाटील, तालुकाप्रमुख संजय मोटे , अन्नासाहेब शिंदे, शिवाजीथेटे, गोकुळ डहाके, युवा सेनाचे उमेश मोकासे, योगेश पवार, विलास पाटणी, संजय पिंपळे,

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रसन्ना पाटील, बाबा मोहिते, काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष याकुब भाई, संजय मोटे,

संजय पिंपळे, पद्माकर इंगळे सर, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र आदमाने पाटील, अवचित नाना वळवले, श्रीरंग आमटे पाटील , किशोर नागरे, संदेश कवडे , गजानन मनगटे, प्रविण जाधव, भगवान काजे, विलास पटणी, उमेश मोकाशे, विलास पवार, योगेश पवार, आप चे सैय्यद सलाउद्दीन, रविंद्र पिंपळे, पंजाब शेळके, सोनल पाटील, गंपु जाधव, गजानन मनगटे, किशोर नागरे, संदेश कवडे, प्रवीण जाधव, पद्माकर इंगळे, प्रसन्न पाटील, गणेश शिंदे, याकुब भाई, विश्वास मनगटे, मोगल वाघ , विश्वनाथ मनगटे, प्रकाश जैस्वाल, ज्ञानेश्वर वाडेकर, राजु पवार, दिपक कायस्थ, विश्वास मनगटे, विठ्ठल मनगटे, विनायक पवार, नानाभाऊ पवार, विजय घुले, करंजखेड येथील नासेर खान आदींची उपस्थिती होती.

# हेल्मेट न घालणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वाहतुकीचे नियम तोडण्यात नागपूरकर राज्यात पहिल्या क्रमांकावर असून वाहतूक पोलिसांनी तीन महिन्यांत ३ लाख १५ हजार वाहनचालकांवर कारवाई करून ४ कोटी ७५ लाख रुपये दंड वसूल केला. यामध्ये फक्त तीन महिन्यात दोन लाखांवर हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकीचालकांवर कारवाई केल्याचा समावेश आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कारवाई असल्याचा दावा वाहतूक पोलिसांनी केला आहे.

नागपुरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये मोठी चढाओढ असते. शासनाकडून दंडाची रक्कम वाढवल्यानंतर वाहतूक नियम पाळणाऱ्यांची संख्या वाढेल, अशी आशा होती. मात्र, याउलट वाहनचालकांकडून मोठ्या प्रमाणात वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन केल्याचे समोर आले आहे. जानेवारी ते मार्च या महिन्यादरम्यान नागपुरात ३ लाख १५ हजार वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केले. त्यात सर्वाधिक चालान हेल्मट न घालणाऱ्यांवर करण्यात आले. १ लाख ९८ हजार २११ वाहनचालकांवर हेल्मट न घातल्याप्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच शहरात पार्किंगची मोठी समस्या आहे. मात्र, अनेक ठिकाणी महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी अनेक ठिकाणी वाहनतळ निर्माण केली आहेत. तरीही अनेक वाहनचालक रस्त्यावर वाहन उभे करतात. ही स्थिती बाजाराची ठिकाणे, गजबजलेली ठिकाणे, रुग्णालये, शाळा-महाविद्यालये आणि शासकीय कार्यालये, अशा ठिकाणी जास्त असते. वाहतूक पोलिसांनी नेमलेल्या खासगी कंपनीची वाहने रस्त्यावरील वाहने टोईंग वाहनातून टाकून वाहतूक कार्यालयात नेतात. दुचाकीला ७८६ तर चारचाकीला १०५० रुपये दंड आकारल्या जातो. तरीही नागपूरकरांची रस्त्यावर वाहने उभी ठेवण्याच्या सवयीत सुधारणा होत नाही.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर